web: http://navakal.org,
e-mail- info@navakal.org

वर्ष-९० | अंक-५ | मुंबई | सोमवार १२ मार्च २०१२ | संपादक : सौ. जयश्री खाडिलकर-पांडे | पाने-८ | किंमत:₹ २

REGD. No. MH/MR/SOUTH-143/2012-14

एकमेव स्वतंत्र दैनिक

# नवाकाळ

एक चळवळ

## गिरणीकामगार नेत्यांनी रामदास आठवलेंची भेट घेतली

मुंबई, रविवार - गिरणी कामगारांना हक्काची घरे मिळावीत, या मागणीसाठी गिरणीकामगारांचे बेमुदत ठिय्या आंदोलन २० मार्चपासून मुंबईत आझाद मैदानावर होत आहे. आज गिरणीकामगार एकजुटच्या सर्व नेत्यांनी रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष रामदास आठवले यांची 'संविधान' या त्यांच्या मुंबईतील बंगल्यावर भेट घेतली.

मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी गेल्या अधिवेशनात गिरणीकामगारांना दिलेले एकही आश्वासन पाळले नाही, यामुळे गिरणीकामगार संतप्त आहेत, असे नेत्यांनी सांगितले. रामदास आठवले म्हणाले की, 'मुख्यमंत्र्यांनी गेल्या मुंबईतील अधिवेशनात आश्वासन दिल्याने महायुतीने मुंबई बंदचा निर्णय मागे घेतला होता. मात्र मुख्यमंत्र्यांनी एकही आश्वासन पाळले नाही. आता त्यांनी लवकरात लवकर बैठक बोलावून निर्णय घ्यावा. अन्यथा गिरणी कामगारांसाठी तीव्र आंदोलन छेडावे लागेल.'

# पळणाऱ्या सुरेश जैन यांना नाकाबंदी करून अटक

# ९ दिवसांची पोलीस कोठडी! महाराष्ट्रात खळबळ!

**जळगाव, ता. ११ - संपूर्ण महाराष्ट्रात राजकीय खळबळ माजविणारी घटना घडली आहे. यापूर्वी शेकडो कोटींचे घोटाळे करूनही पोलिसांच्या हाती कधीही न सापडलेले जळगावचे सर्वेसर्वा सुरेशदादा जैन यांना ८० कोटींच्या घरकूल घोटाळ्यात रात्री उशिरा अटक झाली. आपल्याला अटक होणार, याची चाहूल लागताच रात्री साडेबारा वाजता सुरेशदादा जैन हे आपल्या फोर्ड आयकॉन गाडीतून इंदूरला पळत असताना जळगाव-चोप्रा मार्गावरील धरणगाव येथे पोलिसांनी नाकाबंदी करून सुरेशदादांना अटक केली. आज त्यांना जळगाव न्यायालयात हजर केले असता, न्यायालयाने त्यांना १९ मार्चपर्यंत नऊ दिवसांची कोठडी ठोठावली आहे. झोपडपट्टीवासियांना छप्पर देण्याच्या या योजनेत घोटाळा करून त्यांच्या डोक्यावर छप्पर काढून घेणाऱ्या सुरेशदादा जैन यांना आलिशान बंगला सोडून आता पोलीस कोठडीत बसावे लागले आहे. पापाचा घडा कधी ना कधी भरतोच. खूप वर्षे अटक टाळणाऱ्या सुरेशदादा जैन यांना अखेर पोलीस लॉकअपमध्ये बसावे लागले आहे. सुरैशदादा जैन यांच्याबरोबरच जळगावचे पालकमंत्री व राज्याचे कृषिराज्यमंत्री गुलाबराव देवकर यांनाही या घोटाळ्यात लवकरच अटक होणार आहे.**



मध्य प्रदेशात पळणाऱ्या सुरेशदादा जैन यांना शनिवारी मध्यरात्री धरणगाव चेक नाक्यावर पोलीस अधीक्षक बी.एस. शृंगारे यांनी अटक करून जळगावच्या एमआयडीसी पोलीस ठाण्यात आणताच संपूर्ण शहरात एकच खळबळ उडाली. सुरेशदादा जैन हे शिवसेनेचे आमदार आहेत. त्यांचे शेकडो समर्थक रात्रीच पोलीस ठाण्यात जमा झाले. तिथे त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली. या समर्थकांना पांगविण्यासाठी पोलिसांना लाठीमारही करावा लागला. आज दुपारी सुरेशदादा जैन यांना न्यायालयात नेतानाही जळगाव शहरात कडेकोट बंदोबस्त होता. शेकडो पोलीस आणि एसआरपीचे जवानही ठिकठिकाणी तैनात करण्यात आले होते. १९८० पासून जळगाव शहराचे सुरेशदादा जैन हे अनभिषिक्त सम्राट आहेत. जळगाव नगरपालिका सतत तीस वर्षे त्यांच्याच ताब्यात आहे. या काळात रस्ते बांधणी, वाघूर पाणीपुरवठा योजना, विमानतळ विकास अशा सर्व योजनांमध्ये सुरेशदादांच्या नेतृत्वाखाली ४०० ते ५०० कोटींचा घोटाळा झाल्याच्या तक्रारी अनेकांनी केल्या. २००३ साली ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी सुरेशदादा जैन यांच्या भ्रष्टाचाराविरोधात रणशिंग फुंकले. त्यावेळी जोशी समितीही नेमण्यात आली होती. त्यानंतर २००७ साली सुरेशदादांच्या भ्रष्टाचाराची चौकशी करण्यासाठी न्या.

▶ सविस्तर वृत्त पान ४ वर

## यशवंतराव



महाराष्ट्राचे शिल्पकार व चारित्र्याचे आदर्श यशवंतराव चव्हाण यांची आज सोमवार १२ मार्च २०१२ रोजी जन्मशताब्दी सुरू होत आहे. त्यानिमित्त गेट वे ऑफ इंडिया येथे शानदार समारंभ असून राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील, मुख्यमंत्री ना. पृथ्वीराज चव्हाण व शरद पवार उपस्थित राहतील. दरम्यान, अग्रलेखांचे बादशहा नीलकंठ खाडीलकर यांच्या 'यशवंतराव' पुस्तकाची 'मौज'ने छापलेली तिसरी आवृत्ती समाप्त झाली आहे.



महाराष्ट्राची भूकंपाने आणि पुरांनी जितकी हानी झाली, त्यापेक्षा अधिक हानी संयुक्त महाराष्ट्रात दोनच वर्षे (१९६० ते १९६२) राज्य करून ना. यशवंतरावांना दिल्लीला जावे लागल्यामुळे झाली.

## तबरेज सायेकरच्या मृत्यूची घटना आम्ही कदापि विसरू शकणार नाही

### जैतापूर प्रकल्पविरोधी यात्रेत शिवसेनेची ग्वाही

रत्नागिरी, ता. ११ - जैतापूरच्या विनाशकारी प्रकल्पाला विरोध करताना छेडलेल्या आंदोलनामध्ये बळी पडलेल्या तबरेज सायेकरच्या मृत्यूची घटना आम्ही कदापि विसरू शकणार नाही. आमच्या अंगात रक्त असेपर्यंत या प्रकल्पाला आम्ही विरोध करतच राहणार, असा आदेशच आम्हाला कार्याध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी दिला आहे, अशी ग्वाही शिवसेनेचे रत्नागिरी जिल्हाप्रमुख राजेंद्र महाडिक यांनी आज जैतापूर प्रकल्पविरोधी जनजागृती यात्रेत दिली. पोलिसांनी अनेक अटी लादूनही आज शिवसेनेने काढलेल्या या जनजागृती यात्रेला अनेक गावातील नागरिकांनी मोठी उपस्थिती दाखवली होती. दरम्यान, हे जनजागृती आंदोलन मोडून काढण्यासाठी पोलिसांनी छावणीचे स्वरूप निर्माण केले होते.

आजसकाळीरत्नागिरीतील आठवडे बाजारापासून या जनजागृती यात्रेला सुरुवात झाली. या यात्रेमध्ये शिवसेनेचे जिल्हाप्रमुख राजेंद्र महाडिक, आमदार राजन साळवी, भाजपा नेते बाबा परूळेकर, रत्नागिरी जिल्हा विकास मंचाचे अध्यक्ष डॉ. विवेक भिडे, समाजवादी नेते प्रा. गोपाळ दुखंडे (सिंधुदुर्ग), कोकण विनाशकारी प्रकल्पविरोधी समितीचे सत्यजित चव्हाण,

▶ सविस्तर वृत्त पान ४ वर

## दिवंगत पवनराजेंच्या पत्नीची मागणी अलिबाग येथील खटला मुंबईत चालवा

मुंबई, रविवार - उस्मानाबादचे काँग्रेस नेते दिवंगत पवनराजे निंबाळकर खून खटल्याला आता वेगळे वळण लागले आहे. पवनराजे खून खटल्यातील प्रमुख आरोपी राष्ट्रवादीचे नेते व खासदार पद्मसिंह पाटील हे साक्षीदारांवर दबाव आणत असून हा खटला अलिबाग येथे न चालविता मुंबई येथे चालवावा, अशी मागणी दिवंगत पवनवराजे यांच्या

▶ सविस्तर वृत्त पान ४ वर

## अखेर कापूस निर्यात बंदी केंद्र सरकारने उठविली!

नवी दिल्ली, ता.११- पांढरे सोने म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कापसावरील निर्यात बंदी अखेर आज केंद्र सरकारने उठवून शेतकऱ्यांना दिलासा देणारा निर्णय घेतला. काल केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी नाशिकच्या एका कार्यक्रमात बोलताना या निर्णयाचे संकेत दिले होते. केंद्र सरकारने कापसावर निर्यात बंदी लादल्यामुळे शरद पवार यांच्यावर चौफेर टीका झाली होती.




### प्रकाश मोहाडीकर यांचा ठाम विश्वास

## 'मला आणखी जगून साने गुरुजींचे विचार खेड्या-पाड्यात पोहोचवायचेत!'



मुंबई, रविवार - 'दादरभूषण' प्रकाश मोहाडीकर यांनी नुकतेच ९० व्या वर्षांत पदार्पण केले. त्यानिमित्त आयोजित स्नेह-मिलन मेळाव्यात प्रकाश मोहाडीकर यांनी ठाम विश्वासाने म्हटले की, 'मी वयाची ९३ वर्षे पूर्ण केली, पण आता कॅन्सरसारखा आजार वाढीस लागला आहे. मात्र, तरीही मला सानेगुरुजींचे विचार खेड्या-पाड्यात पोहोचविण्यासाठी आणखी जगायचे आहे.'

दादरच्या शिवाजी विद्यालयात आयोजित केलेल्या

▶ सविस्तर वृत्त पान ४ वर

## 'एकच राज आनंदराज' व्हीसीडीचे प्रकाशन

मुंबई, रविवार - इंदू मिलची जमीन मिळावी यासाठी आनंदराज आंबेडकर यांनी केलेल्या अभूतपूर्व गनिमी काव्याच्या आंदोलनाची व्हीसीडी तयार करण्यात आली आहे. 'एकच राज आनंदराज' या व्हीसीडीचे प्रकाशन १४ मार्च रोजी सायंकाळी ६.३० वाजता राष्ट्रमाता मीराताई आंबेडकर यांच्या हस्ते दादर येथे होणार आहे.

**शुभराशी - ५,६,९**



पवईतील श्री संत पाचलेगावकर महाराजांच्या मुक्तेश्वर आश्रमाच्या चार मजली इमारतीचे उद्‌घाटन करताना श्रीमती प्रेमकुमार चित्तरंजन शर्मा. सोबत नगरसेवक चंदन चित्तरंजन शर्मा, कनिना राज्याध्यक्ष मा. नगरसेविका चारू चंदन शर्मा, मोहन कुलकर्णी नरोत्तम चित्तरंजन शर्मा, एस.आर. पिल्ले व इतर मान्यवर दिसत आहेत. या प्रसंगी सदर वास्तू चित्तरंजन शर्मा परिवार व शर्मा फाऊंडेशन स्व:खर्चाने बांधून समाविष्टधर्म संचारेश्वर ट्रस्टला हस्तांतरीत केली.

## गोवंडीतील नागरिकांच्या प्रश्नावर आंदोलने करणार! मोर्चे काढणार

मुंबई, रविवार - गोवंडीतील न्यू लिम्बूनी बाग, टाटानगर, भैय्यासाहेब आंबेडकरनगर, आशिषनगर या परिसरातील नागरी समस्या सोडवण्यासाठी आणण रस्त्यावरचा लढा लढणार आहे. तसेच वेळप्रसंगी या नागरिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी आंदोलने केली जातील, मोर्चे काढले जातील, अशी आश्वासने काँग्रेस पक्षाचे स्थानिक नेते रमेश कांबळे यांनी येथे बोलताना दिली.

## विद्युत रोहित्रातील कॉईलची चोरी

नांदेड, ता. ११ - विद्युत वितरण कंपनीच्या विद्युत रोहित्रातील कॉपर कॉईल चोरून नेल्याची घटना घडली आहे.

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या लिंबगाव अंतर्गत असलेल्या २५ के.व्ही. रोहित्रामधील ४० किलो ग्रॅम कॉपर कॉईल ज्याची किंमत ५५ हजार रुपये चोरून नेली, तसेच रोहित्रामधील ६५ लिटर ऑईल ज्याची किंमत १५ हजार रुपये असा एकूण ७० हजार रुपयाचा माल चोरून नेल्याची फिर्याद विद्युत वितरण कंपनीचे कनिष्ठ अभियंता जनार्दन जयवंतराव चौधरी यांनी दिली असून त्यानुसार लिंबगाव पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# सांगलीच्या अमिरबी शेख या महिलेच्या रूपाने मला देवाचे दर्शन झाले -वास्तूतज्ज्ञ आनंद पिंपळकर

सांगली, ता.११- सांगलीच्या अमिरबी शेख या महिलेच्या रूपाने मला देवाचे दर्शन झाले, अशा शब्दात सुप्रसिध्द वास्तुतज्ज्ञ-वास्तुविशारद आनंद पिंपळकर यांनी आपल्या भावना व्यक्त केली.

सांगलीच्या वेश्या वस्तीत सुरू असणाऱ्या देशातील पहिल्या वेश्या साक्षर शाळेला नुकतीच आनंद पिंपळकर यांनी सपत्नीक सदिच्छा भेट दिली, यावेळी ते बोलत होते.

यावेळी आनंद पिंपळकर यांनी संस्थेच्या सुरू असणाऱ्या उपक्रमाची पाहणी करून वेश्या वस्तीत सुरू असणाऱ्या या उपक्रमांचे कौतुक केले. तसेच या उपक्रमांची नोंद गिनीज बुक ऑफ रेकॉर्ड कडे पाठवण्याची ग्वाहीही आनंद पिंपळकर यांनी दिली. तब्बल पाऊन तास पिंपळकर पती पत्नी सांगलीच्या वेश्या वस्तीत वेश्या साक्षर महिलांसोबत होते. परिस्थितीने ओढलेल्या या महिलांनी घेतलेली झेप आणि त्यांच्या धाडसाचे कौतुक करीत त्यांना साथ देणाऱ्या अमिरबी शेख आणि पत्रकार दीपक चव्हाण यांचा झी२४ तास वाहिनीचा अनन्य सन्मान पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार केला. यावेळी बोलताना आनंद पिंपळकर यांनी सांगलीच्या अमिरबी शेख यांच्या रूपात मला देवाचे खरे दर्शन झाल्याचे सांगून देव आपणाला कुठल्या रूपात आणि कुठे दर्शन देईल हे सांगता येत नाही पण मी माझ्या देवाच्या दर्शनासाठी वेश्या वस्तीत पोहोचलो आणि दर्शन घेतले, अशी प्रतिक्रियाही आनंद पिंपळकर यांनी व्यक्त केली.

यावेळी आनंद पिंपळकर यांनी मुलींचे कौतुकही करीत संस्थेच्या अध्यक्षा अमिरबी शेख यांना ११ हजारांची देणगी दिली. तसेच या संस्थेच्या मदतीसाठी लवकरच आनंदी वास्तूचा एक शो सांगलीत आयोजित करून त्यातून जमा होणारी रक्कम संस्थेला देण्याचा मनोदयही आनंद पिंपळकर यांनी व्यक्त केला.

## मुंबादेवी स्टील सेंटरमधील

## कामगाराला युनियनचे सदस्यत्व स्वीकारले म्हणून जबर मारहाण

मुंबई, रविवार- अखिल भारतीय कामगार युनियनचे सदस्यत्व स्वीकारले म्हणून कुंभारवाडा परिसरातील मुंबादेवी स्टील सेंटरमधील एका कामगाराला मालकाने बेदम मारहाण करून कामावरून काढण्याची घटना घडली.

याप्रकरणी ननकी मिश्रा नावाच्या या कामगाराने व्ही.पी.रोड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

याबाबत पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीनुसार, ननकी मिश्रा नावाचा हा कामगार मुंबादेवी स्टील सेंटर याठिकाणी 'डीलिव्हरी मॅन' म्हणून काम करीत होता. मात्र अलिकडेच त्याने कामगार नेते ॲड. सुनील पाटील यांच्या अखिल भारतीय कामगार संघटनेचे सदस्यत्व स्वीकारले. त्यामुळे कंपनीमालक हरिश जोशी यांनी कामगार ननकी मिश्रा यांच्यावर चोरीचा खोटा आरोप करून एका बनावट सीआयडी पोलिसांकरवी जबर मारहाण केली. तसेच गिरगाव कोर्टात नेऊन जबरदस्तीने स्टॅम्प पेपरवर सही करायला भाग पाडले व कामावरून हाकलून दिले.

ननकी मिश्रा याला जबर मारहाण करण्यात आल्याने त्याच्यावर जे.जे. हॉस्पिटलकडून उपचार सुरू आहेत. दरम्यान, खोटे आरोप करून या कामगाराला मारहाण करणाऱ्या संबंधितावर पोलिसांनी तत्काळ कारवाई करून त्याला न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी अखिल भारतीय कामगार संघटनेचे अध्यक्ष ॲड. सुनील पाटील यांनी केली आहे.

# गोरेगावच्या 'करून दाखवलं' प्रदर्शनाला शिवप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद

मुंबई, रविवार- महाराष्ट्राचे आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त गोरेगाव शिवसेना शाखा क्र.५१ आयोजित 'करून दाखवलं' या दृक्‌-श्राव्य प्रदर्शनाला उपनगरातील शिवप्रेमींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख श्री बाळासाहेब ठाकरे यांचे आशीर्वाद आणि शिवसेना कार्यप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना-भाजपा युतीने गेली १५ वर्षे मुंबईत केलेल्या विकासकामांचे दर्शन प्रदर्शनात घडवण्यात आले. शिवसेना नेते आमदार सुभाष देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली माजी नगरसेवक दिलीप शिंदे आणि विद्यमान नगरसेविका प्रमिला दिलीप शिंदे यांनी मोतीलालनगर नं. १ येथे मुंबापुरीच्या विकासाच्या वाटचालीचा आढावा घेणाऱ्या या प्रदर्शनाचे आयोजन शिवजयंतीनिमित्त केले होते.

मुंबईचा पाणीपुरवठा, स्वच्छता, अत्याधुनिक रुग्णालये, महापालिका शाळांतून दिले जाणारे हायटेक शिक्षण,सुंदर उद्याने आणि महापालिकेच्या माध्यमातून घडविण्यात आलेल्या मुंबईचा कायापालट प्रदर्शनातून मांडण्यात आला. उपनगरातील हजारो नागरिकांनी हे प्रदर्शन पाहिले.

# रेशनवरील धान्य परस्पर खासगी गोदामात उतरविले

कल्याण, ता. ११ - सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत शिधापत्रिकेवर अनुदानित दराने वितरित होणारा धान्यसाठा शासकीय गोदामात न नेता, परस्पर शहाड येथे उतरविणाऱ्या दोघांना महात्मा फुले चौक पोलिसांनी अटक केली आहे. ट्रकचालक बन्सी उत्तम वाघमारे व हमाल शंकर विलास कसबे अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.

भिवंडी येथील शासकीय गोदामातून उचलण्यात आलेला धान्यसाठा मुरबाड येथील शासकीय गोदामात नेण्याऐवजी स्वत:च्या फायद्याकरिता परस्पर शहाड येथील नवरंग सोसायटीतील गाळ्यात उतरविण्यात आला. त्यामध्ये ५० किलो तांदळाच्या २८० गोण्या, ५० किलो गव्हाच्या ९५ गोणी, ६० रिकामी पोती व शिलाई मशीन आदींचा समावेश आहे.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत शिधापत्रिकेवर अनुदानित दराने वितरित करण्याचे धान्य स्वत:च्या फायद्यासाठी, अवैधरित्या उतरवून आर्थिकदृष्ट्या दुर्बल जनतेची व शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी बन्सी व शंकर याला अटक करण्यात आली आहे. त्यांच्यासह ट्रकमालक सुदाम सानप, धनलक्ष्मी ट्रान्सपोर्ट व आणखी एक हमालावर गुन्हा दाखल करून ट्रक व धान्यसाठा जप्त करण्यात आला आहे.

# बिअर वरून वाद झाल्याने मित्राची भोसकून हत्या

भिवंडी, ता. ११ - मुंबई-नाशिक महामार्गावरील सरवलीपाडा येथील मालवा धाब्यावर होळी सणाची पार्टी करण्यास बसलेल्या मित्रांमध्ये बिअर आणण्यावरून वाद झाल्याने तीन मित्रांनी एका मित्रास भोसकून ठार मारल्याची घटना शुक्रवारी मध्यरात्री मालवा धाब्यावर घडली आहे. या हत्येप्रकरणी तिघांवर कोनगाव पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल केला असून दोघांना पोलिसांनी अटक केली आहे.

राजू ऊर्फ गुरुदीपसिंग चरणसिंग (३६) रा. मालवा ढाबा असे हत्या करण्यात आलेल्या मित्राचे नाव आहे. तो रंजन, दीपक, विश्वास, अजय निंबाळकर या मित्रांसोबत पार्टीसाठी बसला असता, राजूने रंजन यास बिअर आणण्यास सांगितले, त्यास रंजनने नकार दिला. त्यावेळी राजूने रंजनच्या थोबाडीत चापट मारली. या गोष्टीचा मनात राग धरून संगनमताने रंजनने काकडी सोलण्याची सोलणी राजूच्या कपाळात भोसकली. तर दिपकने कांदा सोलण्याचा लाकडी ठोकळा कपाळात मारला व अजय याने लाथा बुक्क्यांनी बेदम मारहाण केली. गंभीर जखमी झालेला राजू जागीच ठार झाला. या घटनेप्रकरणी रंजन, दीपक, अजयचा तिघांवर खुनाचा गुन्हा दाखल केला असून दीपक व अजय या दोघांना अटक केली आहे.

## अंत्यविधी पार पाडून शिमगोत्सव उत्साहात

खेड, ता. ११- खेड शहरात शिमगोत्सव आगळ्या-वेगळ्या पद्धतीने पार पडतो. या ठिकाणी माणसाचा पुतळा बनवून त्याला मढ्यासारखे सजवून तिरडीवर ठेवले जाते. त्यानंतर त्याची गावातून अंत्ययात्रा काढून ते होमात टाकतात. अशा पद्धतीने हा शिमगोत्सव उत्साहात पार पडतो.

## वाडोसची ग्रामसेविका सेवेतून निलंबित

सिंधुदुर्ग, ता.११- भातपीक नुकसानीचे पंचनामे योग्यप्रकारे न केल्याचा ठपका ठेवत कुडाळ तालुक्यातील माणगांव खोऱ्यातील वाडोस ग्रामसेविका चित्रा म्हाडगूत यांना सेवेतून बडतर्फ करण्यात आले. हा निर्णय जि.प.च्या स्थायी समितीच्या बैठकीत घेण्यात आला. सिंधुदुर्ग जि.प.अध्यक्षा सौ.सुमेधा पाताडे यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा झाली.

## रंग लावण्याच्या कारणावरून भोकरमध्ये दोन गटांत हाणामारी

नांदेड, ता. ११ - रंगपंचमीच्या दिवशी रंग टाकण्याच्या कारणावरून दोन गटांत तुंबळ हाणामारी झाली असून परस्पर तक्रारीवरून दोन्ही गटाच्या लोकांविरुद्ध भोकर ठाण्यात गुन्हे नोंदविण्यात आले आहे.

रंगपंचमीच्या दिवशी दुपारी २ वाजेच्या सुमारास मोंढा मार्केट भोकर येथील सार्वजनिक रस्त्यावर भुमन्ना, आडेलू, बालाजी पवार, बालाजी पुंजलवाड, सचिन कोडे, बालाजी बेडेवार व इतर सहा ते सातजणांनी रंग टाकण्याच्या कारणावरून वाद घालून शेख फेरोज खान अमिर खान याला काठ्या व दगडांनी डोक्यात, हातावर व इतर ठिकाणी मारहाण करून दुखापत केली व जीवे मारण्याची धमकी दिली असल्याची फिर्याद शेख फेरोज खान अमिर खान याने भोकर पोलिस ठाण्यात दिली आहे.

## आयपीएस नरेंद्र कुमार यांच्यावर अंत्यसंस्कार

भोपाळ, ता. ११ - खान उत्खनन अवैध सुरु असताना त्याविरोधात कारवाई करणाऱ्या आयपीएस नरेंद्र कुमार यांच्या अंगावर ट्रॅक्टर घालून त्यांना ठार करण्यात आले होते. हा प्रकार उघडकीस येताच, संपूर्ण देशात खळबळ माजली होती. आयपीएस नरेंद्र कुमार यांच्यावर आज मोठ्या जनसमुदायाच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार करण्यात आले. नरेंद्र कुमार यांच्या अंगावर ट्रॅक्टर घालणाऱ्या मनोज सिंग या चालकाला पोलिसांनी अटक केली आहे.

**NOTICE**

Process fee paid Rs.5/-. Exh. No. 18
04/02/2012 N.D.19/04/2012

IN THE COURT OF SHRI L.B.MAGDUM, JUDGE,
FAMILY COURT, MUMBAI AT BANDRA.

PETITION NO. C/09/2011.

**Smt. Jayashree Balkrishna Thore,**
R/at:- Blue Empire Complex, Blue Oasis-2, C/105,
Mahavir Nagar, Kandivali(W), Mumbai:- 400067 **..Petitioner.**

Versus

**Shri. Balkrishna Ramchandra Thore,**
R/at:- C/o. Manager, City Sainik Board, Collector Office,
9th Floor, Near Chetana College, Government Colony,
Bandra (E), Mumbai. **..Respondent**

To,
**Shri. Balkrishna Ramchandra Thore,**
R/at:- C/o. Manager, City Sainik Board,
Collector Office, 9th Floor, Near Chetana College,
Government Colony, Bandra (E), Mumbai. **..Respondent**

TAKE NOTICE THAT the petitioner above named has filed a petition against you for a decree of Maintenance under section 18 (1) (2) (a) & (b) of the Hindu Adoption & Maintenance Act, 1956.

TAKE FURTHER NOTICE THAT the petition is fixed for hearing and final disposal on the **19th day of April 2012** at **10.30 am** sharp in Family Court No.2, at Bandra, Mumbai or before any other Honourable Judge, presiding in the Family Court, Mumbai at Bandra, assigned charge of the said Court No.2 when you are required to appear in person and file your Written Statement and in default of your doing so, the Honourable Judge, Family Court will proceed to hear the said petition, against you *Ex-parte* and pronounce Judgment thereon.

THIS NOTICE IS ORDERED by Honourable Judge Shri LB.Magdum, presiding in Court No.2, on 04th day of Feb., 2012.

Given under my hand and Seal of this Court,
Dated this 24th day of Feb., 2012.

Seal

Sd/-
Dy. Registrar,
Family Court, Bandra-Kurla Complex,
Bandra (East), Mumbai 400 051.

## जाहीर नोटीस

वसई येथील मे. जिल्हा न्यायाधीश-१ व अति.सत्र न्यायाधीश, वसई यांचे न्यायालयात
दिवाणी चौ. अर्ज. ०८/२०१२
निशाणी क्र. ०७

१. श्रीमती अंकीता भरत जोशी,
सध्याची श्रीमती श्वेता संजय जोशी,
रा. द्वारा संजय नारायण जोशी,
डी/११६, अवधूत को. ऑप.हौ.सो.
दत्तमंदिर रोड, एम.बी.इस्टे. पी.,
विरार पश्चिम, जि. ठाणे ...अर्जदार

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी सदर न्यायालयात गार्डीयन ॲण्ड वॉर्डस ॲक्टचे कलम ७ प्रमाणे अर्ज दाखल केला आहे. अर्जदार यांनी कुमार प्रणव भरत जोशी याच्यासाठी अज्ञान पालनकर्ता दाखला मिळणेकरिता या न्यायालयात चौ. अर्ज ०८/२०१२ दाखल केलेला आहे.

ज्याअर्थी कुमार प्रणव भरत जोशी याचे आई वडीलांचा दिनांक १६ नोव्हेंबर २००५ रोजी घटस्फोट झाला असून त्यानंतर त्याची आई श्रीमती अंकिता भरत जोशी यांचा दि. १४/०२/२००६ रोजी श्री. संजय नारायण जोशी यांच्या सोबत पुर्नविवाह झाला आहे. कुमार प्रणव भरत जोशी याचा पालकत्व म्हणून त्यांचे नावे कायदेशीर बाबीची पुर्तता करणे आहे.

त्याअर्थी या नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, ज्या कोणास अर्जदार यांस त्यांचे अज्ञान मुलाचे पालकत्व जाहीर होण्यास हरकत घ्यावयाची असेल त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून एक महिन्याच्या आत आपली योग्य ती हरकत जिल्हा न्यायाधिश-१ वसई यांचे न्यायालयात दाखल करावी अन्यथा सदर प्रकरणी कायद्याच्या तरतुदीनुसार योग्य तो आदेश करण्यात येईल.

आज दि. ०९/०३/२०१२ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली असे.

सही/-
(आत्माराम स. खुताडे)
कनिष्ठ लिपीक
जिल्हा व अति. न्यायालय, वसई

शिक्का

सही/-
(एस.जी. कोकीळ)
अधिक्षक
जिल्हा व अति. न्यायालय, वसई

महावितरण

जाहीर निवेदन

वागळे इस्टेट विभागाअंतर्गत कोलशेत या उपविभागातील २२ के.व्ही कोलशेत या फिडरसची जूनी विजवाहीनी बदलण्याचे काम गुरूवारी दि. १२.०१.२०१२ रोजी खालील वेळेत हाती घेण्यात येणार आहे. त्यामुळे खालील विभागाचा विजपुरवठा खालील वेळेत बंद राहिल. तरी कृपया सहकार्य करावे.

२२ के.व्ही. कोलशेत :- वेळ १०.०० ते १७.०० आझाद नगर, मनोरमानगर, मानपाडा, स्मशानभूमी, शिवाजीनगर

कार्यकारी अभियंता, वागळे इस्टेट विभाग

Mumbai District Central Co-op. Bank Ltd.
Mumbai Bank Bhavan, 207
Dr. D.N. Rd., Fort, Mumbai-1

Requires
PREMISES
for its Bank Branch

at the below mentioned places admeasuring 600 to 800 sq. ft. Carpet preferably on ground floor on rental Basis:

CHARKOP KANDIVALI

DAHISAR (WEST)

Interested premises owner's may sent their proposal with Details of Place, Title, Terms & Conditions within 10 days.

General Manager

### वसुली अधिकाऱ्यांच्या समक्ष
### कर्जवसुली न्यायाधिकरण - २ मुंबई

५ वा मजला, सिंदिया हाऊस, नरोत्तम मोरारजी मार्ग, बॅलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ०३८.

### जाहीर सूचना

यांच्या दरम्यान **वसुली प्रक्रिया क्र. ६१८/२००४** **एक्झि. ५७**

**देना बँक (खारीक बाजार शाखा)** ... प्रमाणपत्र धारक (मूळ अर्जदार)

विरुद्ध

**व्हर्ब केमिकल इंडस्ट्रीज व अन्य** ......... प्रमाणपत्र ऋणको (मूळ प्रतिवादी)

ज्याअर्थी सन्मा. पीठासीन अधिकारी, कर्जवसुली न्यायाधिकरण २, मुंबई यांनी ₹**१,०१,६७,६८५.४९** अधिक त्यावरील अर्ज भरल्याच्या तारखेपासून प्रमाणपत्र ऋणको/प्रतिवादींद्वारे तडजोडीच्या तारखेपर्यंत दरसाल १२% द.सा. दराने व्याज जी रक्कम वसुली प्रमाणपत्र/करारपत्रानुसार व्याज, मूल्य, अधिभारांसहित वसुली करण्यायोग्य असेल, या रकमेच्या वसुलीकरिता मूळ अर्ज क्र. ४४३/२००१ मध्ये वसुली प्रमाणपत्र जारी केले आहे.

आणि ज्याअर्थी सदर वसुली प्रमाणपत्राअंतर्गत ₹ **७,५१,५१,८४७.४९** या रकमेच्या त्यावरील मूल्य व व्याजासहित वसुलीकरिता **दि. १९ एप्रिल, २०१२ (विक्रीसाठी निश्चित तारीख)** ही तारीख निश्चित करण्यात आली आहे.

विक्रीच्या प्रक्रिया तसेच विक्रीच्या अटी व शर्तीनुसार खालील परिशिष्टात विस्तृतपणे वर्णिलेल्या स्थावर मालमत्तेची अधोहस्ताक्षरितांद्वारे जाहीर लिलावाद्वारे **दि. १९.०४.२०१२ रोजी दु. ४.३०** वाजता वसुली अधिकाऱ्यांच्या न्यायालयीन सभागृह, डीआरटी - २, ५ वा मजला, सिंदिया हाऊस, एम.एम. मार्ग, मुंबई - ४०० ०३८ या ठिकाणी विक्री करण्यात येईल. स्थावर मालमत्तेच्या परीक्षणाची तारीख सदर ठिकाणी **दि. १२.०४.२०१२ रोजी दु. २.०० ते दु. ४.००** अशी निश्चित करण्यात आलेली आहे.

इसारा रक्कम जमेचा कोणत्याही राष्ट्रीयीकृत/शेड्युल्ड बँकेचा धनाकर्ष/पे ऑर्डर अधोहस्ताक्षरितांकडे **दि. १६.०४.२०१२ रोजी दु. ४.३०** पर्यंत जमा करावी. धनाकर्ष/पे ऑर्डर ही वसुली अधिकारी, डीआरटी - २, मुंबई - ४०० ०३८ यांच्या नावे असावी. अयशस्वी बोलीदारास सदर रक्कम परत केली जाईल. राखीव शुल्काखालील बोली विचारात घेतल्या जाणार नाहीत व अशा बोलींसमवेत असलेली इसारा रक्कम जमा जप्त केली जाईल व अर्जदार बँकेकडे त्यांच्या प्रमाणित देण्यांच्या तडजोडीकरिता वळविण्यात येईल.

निविदा प्रपत्रे व विक्रीच्या अटी व शर्ती विक्रीकरिता, अनुभाग अधिकारी, एमडीआरटी - ३ यांच्याकडे ६ वा मजला, सिंदिया हाऊस, एन. एम. रोड, बॅलार्ड इस्टेट, मुंबई - ३८, आर. पी. क्र. ६१८/२००४ या ठिकाणी उपलब्ध असतील व त्यांची प्रत एमडीआरटी - २ यांच्या कार्यालयात रु. १००/-, निबंधक, डीआरटी - २ यांच्या नावे भारतीय पोस्टल ऑर्डर/धनाकर्षाच्या स्वरूपात भरून कार्यालयीन दिवसांत प्राप्त होतील. वरील मालमत्तेची विक्री ही जशी आहे जेथे आहे व जे आहे तत्त्वावरच असेल. विहित प्रपत्रांतून नसलेल्या तसेच विहित तारीख व वेळेनंतर आलेल्या प्रस्तावांना नाकारण्यात येईल. शेड्युलमध्ये निर्दिष्ट राखीव शुल्काखाली मालमत्तेची विक्री केली जाणार नाही.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

| लॉट्सची संख्या | मालकांच्या नावांसहित मालमत्तेचे वर्णन | मालमत्ते-वरील निर्धारित कर | मालमत्ते-वरील भार | मूल्यांकन/प्रमाणपत्र ऋणकोंद्वारे दिले असल्यास मुल्यांकनही निर्देशित करा | दावे काही असल्यास, जे मालमत्ते पुढे आणले असून व तिच्या स्वरूप व मूल्यावरील अन्य ज्ञात तपशील | राखीव शुल्क ज्याखाली मालमत्तेची विक्री केली जाणार नाही | इसारा रक्कम | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | युनिट/गाळा क्र. बी - १८, तळमजला, इमारत क्र. बी, भवानी इंडस्ट्रियल इस्टेट, गाव अच्छड, तालुका तलासरी, जि.ठाणे, महाराष्ट्र क्षेत्रफळ अंदाजे ५५८ चौ. फूट (बिल्ट अप क्षेत्र) | अज्ञात | जप्त मालमत्ता | ₹ १,३९,५००/- | अज्ञात | ₹ १.१० लाख | ₹ ११,०००/- | |
| २. | युनिट/गाळा क्र. बी - १२, तळमजला, इमारत क्र. बी, भवानी इंडस्ट्रियल इस्टेट, गाव अच्छड, तालुका तलासरी, जि.ठाणे, महाराष्ट्र क्षेत्रफळ अंदाजे ५४० चौ. फूट (बिल्ट अप क्षेत्र) | अज्ञात | जप्त मालमत्ता | ₹ १,३५,०००/- | अज्ञात | ₹ १.१० लाख | ₹ ११,०००/- | |

माझ्या सही व न्यायाधिकरणाच्या शिक्क्यानिशी दि. ०६ मार्च, २०१२ रोजी जारी

शिक्का

सही/-
(बी.एस. साने)
वसुली अधिकारी डीआरटी - २, मुंबई

## नवीन मूळ प्रत

### मुंबईतील न्यायाधिकरणाचे उच्च न्यायालय
### साधारण मूळ दिवाणी अधिकार क्षेत्र
### खटला क्र. १३८२ /२०११

दि. २६.०६.२०११ रोजी तक्रार दिली व नोंद केली.

दिवाणी प्रक्रियेच्या संहितेच्या कलम २७ ओ. व्ही. २ मधील १,५,७ व बी आणि ओ. व्ही. ३ मधील आर.९ अंतर्गत तक्रारीला उत्तर देण्यासाठी समन्स.

स्टेट बँक ऑफ इंडिया, )
स्टेट बँक ऑफ इंडिया कायदा १९५५ नुसार त्यांच्या )
स्थानिक मुख्यालयात सिनर्जी, )
सी-६, जी- ब्लॉक, )
वांद्रे -कुर्ला वांद्रे पूर्व , )
मुंबई- ४०० ०५१ आणि )
त्यांच्या अन्य शाखांपैकी स्टेट बँक ऑफ इंडिया, )
मालाड पूर्व शाखा, मुंबई येथील कार्यालयात स्थापन )
केलेले कंपनी मंडळ व स्ट्रेस्ड असेट्स रिझोलुशन )
सेंटर, ६ वा मजला, द इंटरनॅशनल, )
१६, मार्शल कर्वे रोड, चर्चगेट मुंबई - ४०० ०२० )
येथील त्यांचे वसुली कार्यालय. )
.....वादी

**विरुध्द**

श्रीकांत वाडीलाल देसाई )
वय सुमारे ५७, भारतीय नागरिक, )
मुंबईतील राहणार ७०१, )
इंटर भवन सगृसं लि.,प्लॉट क्र. ३५, )
गोखले रोड, डहाणुकर वाडी, )
कांदिवली (पश्चिम), मुंबई -४०० ०६७. )
...प्रतिवादी

प्रति,
श्रीकांत वाडीलाल देसाई
७०१, इंटर भवन सगृसं लि., प्लॉट क्र. ३५, गोखले रोड,
डहाणुकर वाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई -४०० ०६७.

ज्याअर्थी वरील नमूद वादीने आपण अर्थात प्रतिवादी म्हणून तुमच्यावर खटला दाखल करण्याचे निश्चित केले आहे. त्याअर्थी तो अद्याप दाखल झालेला नसून तुमच्याविरुध्द तक्रार पुढीलप्रमाणे आहे :

अ. सोबत जोडलेल्या परिशिष्ट एच नुसार वादीने केलेल्या दाव्यानुसार त्यांना त्यांनी दावा दाखल केलेल्या तारखेपासून आतापर्यंत १२.७५ टक्के वार्षिक व्याजाच्या दरमहा व्याजाने दोन्ही एकत्रित रु. १,३८,८२३/- रक्कम प्रतिवादीने देण्याचा आदेश व सुनावणी झाली होती ती रक्कम मिळावी.

ब. वरील प्रार्थना (अ.) मधील विकल्प, सोबतच्या परिशिष्ट सी नुसार वादींकरिता तारण गहाण मालमत्ता जप्त करण्याचे आदेश देण्याची माननीय न्यायालयाला विनंती आहे.

क. खटल्याच्या प्रलंबनाच्या काळात, प्रतिवादीकडील योग्य थकीत देण्यांकरिता तारण गहाण मालमत्ता विक्री करण्याची परवानगी वादीला देण्यात यावी.

ड. या खटल्याच्या प्रलंबित सुनावणीदरम्यान व खटला निकालात निघेपर्यत, प्रतिवादींनी स्वत: , त्याचे नोकर व एजंटानी प्रतिवादीच्या मालकीची कोणतीही स्थावर व जंगम मालमत्ता कोणत्याही व्यवहाराने, हस्तांतरण करून, कर्ज बोजा करुन व तिसऱ्या व्यक्तींचे अधिकार निर्माण करून विल्हेवाट लावू नये, यासाठी स्थगिती देण्यात यावी.

ई. खटल्याच्या सुनावणी व अंतिम निकालाच्या विलंबाबाबत, प्रतिवादीने आपली मालमत्ता प्रतिज्ञापत्राद्वारे या माननीय न्यायालयासमोर सादर करण्यासाठी अनिवार्य आदेशाद्वारे या माननीय न्यायालयाने निर्देश द्यावेत.

फ. वादीला खटल्याचा खर्च मंजूर करण्यात यावा.

ग. न्यायदानाकरिता या माननीय न्यायालयाने अन्य व पुढील आदेश द्यावेत अशी विनंती आहे.

त्याअर्थी, तुम्ही आपली बाजू मांडण्यासाठी हा समन्स आपणास मिळाल्यापासून १२ आठवड्यांच्या आत सदर न्यायालयाला आपले म्हणणे लेखी स्वरुपात प्रत्यक्ष उपस्थित राहून किंवा वकिलातनामाने सादर करावे व त्याची एक लेखी प्रत वादीला देणे आवश्यक आहे.

ज्याअर्थी दि. १० एप्रिल २०१२ रोजी न्यायाधिशाच्या पिठासमोर चेंबरमध्ये हा खटला आदेशासाठी ठेवला जाईल.

त्याअर्थी, दि.१० एप्रिल २०१२ रोजी दुपारी ११.०० वाजता वादीने केलेल्या दाव्याबाबत विचारलेल्या प्रश्नांना उत्तरे देण्यासाठी आपण स्वत: किंवा या न्यायालयात प्रॅक्टीस करणाऱ्या वकिलांना आणावे, विचारलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी त्यांना संपूर्ण कल्पना द्यावी किंवा उत्तरे देईल अशा अन्य कोणत्याही व्यक्तीस घेऊन न्यायाधिशांच्या चेंबरमध्ये हजर व्हावे. आणि,

या खटल्यासंदर्भातील अन्य प्रकरणी व नमूद केलेल्या दिवसापूर्वी उपस्थित राहणाऱ्या पक्षांना सुनावणीच्या तारखेनंतर न्यायाधीश निर्देश देतील, हे लक्षात घ्यावे. आणि,

वर नमूद केल्याप्रमाणे आपण स्वत: किंवा वकालतनामाने उपस्थित राहुन किंवा लेखी स्वरूपात आपण आपले म्हणणे मांडले नाही तर, किंवा नमूद केलेल्या तारखेला आपण न्यायाधिशांसमोर हजर राहिला नाहीत तर, त्याच दिवशी किंवा त्यानंतरच्या दिवशी या खटल्यात प्रतिवाद नसल्याचे समजून न्यायालय हा खटला निकालात काढेल व आपल्याविरुध्द कारवाई करण्याचे आदेश दिले जातील.

वर नमूद मुंबई येथील श्री. मोहित शांतीलाल शहा, मुख्य न्यायाधिश यांच्या साक्षीने,
दि. २१ फेब्रुवारी २०१२.

सही/-
प्रोथोनोटरी ॲन्ड सिनियर मॅटर करिता,
सही/-
सिलर
दि. फेब्रुवारी २०१२ या दिवशी.

**मे. एस. व्ही. पिकले व कंपनी,**
वादीचे वकील,
१४, मुंबई म्युच्युअल चेंबर्स,
१९२१, अंबालाल दोषी मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ०२३.

**टीप :** वादी किंवा त्यांच्या वकीलाने प्रतिवादीला पाठवलेल्या तक्रारीची प्रत रेकॉर्डवर राहील.

## महाबळेश्वरात बर्फ,वेण्णा लेक परिसरात पुन्हा गोठले दवबिंदू

कराड, ता. ११ - राज्यात इतरत्र फाल्गुनातही वैशाख वणवा पेटू लागला असतानाच महाबळेश्वरला मात्र ऐन मार्चमध्ये दवबिंदू गोठण्याचा चमत्कार घडत असून शहरापासून सखल भागात असलेल्या वेण्णा लेक परिसरात दवबिंदूचे बर्फ झाले. पर्यटनाचा हंगाम सुरू होत असतानाच पर्यटक निसर्गाच्या या चमत्काराने सुखावले आहेत. महाबळेश्वर थंड हवेचे ठिकाण असले, तरी इतरत्र उन्हाळा वाढत असताना महाबळेश्वरातील तापमान गेले चार दिवस घसरतच आहे. या परिसरात बादलीत भरलेले पाणी ओतता येत नव्हते.त्यातील वरच्या थराचा बर्फ झाला होता.परिसरातील स्ट्रॉबेरीच्या शेतात पानावर जमलेल्या हिमकणांचे बर्फ झाले होते.वेण्णा लेक बोट क्लबच्या प्लॅटफॉर्मवर बर्फाचे कण मोठ्याप्रमाणात दिसून येत होते.

## महिला दिनाच्या पूर्वसंध्येला विवाहितेची जाळून घेऊन आत्महत्या

नांदेड, ता. ११ - मूलबाळ होत नसल्याने सासरच्या मंडळींकडून होणाऱ्या जाचास कंटाळून तसेच मळणीयंत्र व ऑटो घेण्यासाठी सतत होणाऱ्या त्रासास कंटाळून एका तरुण विवाहितेने जाळून घेऊन आत्महत्या केल्याची घटना महिला दिनाच्या पूर्वसंध्येला घडली आहे.

हदगांव तालुक्यातील मौजे आमगव्हाण येथील संदीप बबनराव देशमुख याच्यासोबत सौ. वैशाली संदीप देशमुख (२३) हिचे लग्न झाले होते. लग्नानंतर काही दिवस सौ. वैशालीला सासरच्या मंडळींनी चांगले नांदवले. नंतर मूलबाळ होत नाही म्हणून तिला त्रास देण्यास सुरुवात केली. त्यानंतर मळणीयंत्र व ऑटो घेण्यासाठी माहेराहून ५० हजार रुपये आण म्हणून तिचा मानसिक व शारीरिक छळ करण्यात येऊ लागला. या नेहमीच्या त्रासाला कंटाळून सौ. वैशाली देशमुख हिने महिला दिनाच्या पूर्वसंध्येला ७ मार्च रोजी स्वतःच्या अंगावर रॉकेल टाकून पेटवून घेऊन आत्महत्या केली.

## सत्यवान राऊळ यांची वांद्रे राष्ट्रवादी सहसचिवपदी नियुक्ती

मुंबई, रविवार - नुकत्याच झालेल्या पक्षांतर्गत निवडणुकीत उत्तर-मध्य मुंबई जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वांद्रे तालुका सहसचिवपदी निवड करण्यात आली आहे. केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार व राष्ट्रवादीचे मुंबई अध्यक्ष नरेंद्र वर्मा यांच्या आदेशाने राष्ट्रवादीचे वांद्रे तालुका अध्यक्ष ॲड. खालिद बाबू कुरेशी यांनी सत्यवान राऊळ यांची निवड केली आहे. त्यांच्या निवडीने विभागातील राष्ट्रवादी कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## चेंबूरचे दत्ताराम पाटील यांचे दु:खद निधन



मुंबई, रविवार - चेंबूरच्या घाटले गाव परिसरातील नागेश पाटीलवाडी येथे राहणारे मनमिळावू, सदगृहस्थ म्हणून ज्यांची ओळख असणारे दत्ताराम रामदास पाटील यांचे नुकतेच हृदयविकाराच्या झटक्याने निधन झाले. निधनासमयी ते ६५ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. अलिबाग तालुक्यातील रेवस गावचे मूळ रहिवासी असलेले दत्ताराम पाटील हे घाटले परिसरात सुस्वभावी व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ख्याती होती.

## नांदेडमध्ये पोलीस कर्मचाऱ्यास मारहाण

नांदेड, ता. ११ - पोलीस मुख्यालयात कार्यरत असलेल्या एका पोलीस कर्मचाऱ्यास नऊजणांनी गंभीर मारहाण केल्याची घटना नांदेड शहरात घडली आहे.

पोलीस कर्मचारी जयराम शिवांबर गिते (२५) हे वजिराबाद लॉकप कार्ड ड्युटीला जात असताना मंगेश सम्राट यादव, विजय मदनलाल यादव, रवि नंदू यादव, अभिजित चोरमारे, बबलू यादव, महान सम्राट यादव, अक्षय यादव, मनिष ईश्वरलाल यादव, विशाल ईश्वरलाल यादव (सर्व रा. वजिराबाद, नांदेड) यांनी संगनमत करून जयराम गिते यांना लाथा बुक्यांनी व काठीने मारहाण करुन दुखापत केली व शासकीय कामात अडथळा केला.

## वाहतूक कोंडी टाळण्यासाठी सम-विषम पार्किंगचा प्रस्ताव

नवी मुंबई, ता. ११ - शिरवणे गावातील जुना ठाणे-बेलापूर रोड हा सध्या वाहनांबाबत अडचणीचा विषय बनला आहे. या रस्त्यालगत दोन्ही बाजूला दुतर्फा दुकाने आहेत. दुकानदार तसेच दुकानात येणाऱ्या गिऱ्हाईकांचे वाहने, सायकल रस्त्याच्या कडेला उभी केली जातात. सदरचा रस्ता हा मोठा नसल्याकारणाने तेथे रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या वाहनांना रस्ता अपुरा पडतो तसेच नागरिकांना चालण्यासाठी फूटपाथदेखील मोकळा नाही. त्यामुळे नागरिकांची प्रचंड गैरसोय होत आहे. त्याचप्रमाणे दर रविवारी भरणाऱ्या बाजाराचे वेळी तर वाहनांना व एनएमएमटी बसेसना राजीव गांधी ते शिरवणे फाटादरम्यान पोहोचताना अत्यंत अडचणीचे होते. या वाहतूक समस्येबाबत शिरवणे, नेरूळ परिसरातील नागरिकांच्या वाहतूक विभागाकडे तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. शिरवणे गावातील बाजारपेठेमुळे जुना ठाणे-बेलापूर रोडचे रस्त्यालगत दोन्ही बाजूला पार्क करण्यात येणाऱ्या वाहनांमुळे सदरच्या अरुंद मार्गावर वारंवार वाहतूक कोंडी होत असते. ती टाळण्याचे दृष्टिकोनातून सदर मार्गावर शिरवणे फाटा ते राजीव गांधी उड्डाणपूल, सेक्टर नं. १ नेरूळ या रोडवर दोन्ही बाजूस सम-विषम तारखेस पार्किंग घोषित करण्याचे वाहतूक विभागाने ठरविले आहे. तरी या बदलासाठी नागरिकांकडून काही हरकती अगर सूचना असल्यास वाहतूक पोलिसांकडे लेखी स्वरूपात कळवाव्यात, असे आवाहन केले आहे.

## सद्‌गुरू राऊळ महाराज अभिष्टचिंतन धार्मिक सोहळा मंगळवारपासून

सिंधुदुर्ग, ता. ११ - श्री क्षेत्र पिंगुळी नगरातील प.पूज्य सद्‌गुरू राऊळ महाराज यांचे उत्तराधिकारी प.पूज्य विनायक अण्णा महाराज यांना अभिष्टचिंतन आणि श्री देवी गौरीशंकर मंदिराचा १७ वा वर्धापन दिन धार्मिक सोहळा राऊळ बाबांच्या भक्तांच्या वतीने मंगळवार १३ मार्च रोजी होत आहे. यानिमित्त विठ्ठल नामाच्या भरगच्च दिंड्या, ढोल-ताशांसह नाचत श्री क्षेत्र पिंगुळीनगरीत दाखल होणार आहेत. तरी या सोहळ्याचा लाभ घ्यावा असे आवाहन प.पूज्य सद्‌गुरू समर्थ राऊळ महाराज भक्त मंडळाने केले आहे.

मुख्य कार्यक्रम १३ मार्च रोजी असून समारंभाचा प्रारंभ १२ मार्च रोजीपासून होणार आहे. १२ मार्च रोजी सायं ६ ते ७ वाजता प.पूज्य महाराजांच्या लांजारतीने होणार आहे. विशेष म्हणजे या सर्व कार्यक्रमांचे स्थानिक श्रद्धा वाहिनीवरून थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहे. कार्यक्रमाची सुरुवात सोमवार १२ मार्चपासून होणार आहे.

रात्री १२ वाजता हजारो भक्तांच्या उपस्थितीत प.पूज्य विनायक अण्णा महाराजांचा ६७ वा वाढदिवस औक्षण होणार आहे. त्यानंतर १३ मार्च या मुख्य दिवशी विविध धार्मिक, सांस्कृतिक व मनोरंजनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या सोहळ्यास राऊळ भक्तांनी उपस्थित रहावे असे आवाहन प.पूज्य राऊळ महाराज भक्तगणांनी केले आहे.

## कराडच्या 'कोयना बँके'चा मुद्दा आता मुंबई उच्च न्यायालयात

कराड, ता. ११ - येथील महाराष्ट्र केसरी पै.संजय पाटील यांच्या खुनाचा कट येथील काँग्रेसचे आमदार विलासराव पाटील-उंडाळकर यांचा मुलगा ॲड. उदयसिंह पाटील संस्थापक असलेल्या येथील 'कोयना' सहकारी बँकेत शिजल्याचा उल्लेख सर्व आरोपींच्या दोषारोपपत्रातून वगळण्याच्या सातारा जिल्हा न्यायालयाच्या निर्णयाच्या विरोधात मूळ फिर्यादीच्या वतीने मुंबई उच्च न्यायालयात फौजदारी रिट दाखल करण्यात आली आहे. या याचिकेची सुनावणी येत्या १६ मार्चला होणार असल्याने खटल्याची जिल्हा न्यायालयातील पुढील सुनावणी २१ मार्च रोजी ठेवण्यात आली आहे.

येथील पैलवान संजय पाटील यांचा १९ जानेवारी २००९ रोजी खून झाला होता. संजय पाटील यांना प्रत्यक्ष गोळ्या घालणारे सागर परमार, हमीद रहीम शेख यांच्यासह सलीम महंमद शेख उर्फ सल्या चेप्या,लाजम उल्लाउद्दीन होडेकर,बाबासाहेब रघुनाथ मोरे,संभाजी खाशाबा पाटील,सचिन लक्ष्मण चव्हाण, मुदस्सर निजाम मोमीन यांना कराड पोलिसांनी अटक केली होती. २ जुलै रोजी त्याच्याविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र पाठविण्यात आले होते. गेल्या २४ जाने.रोजी झालेल्या सुनावणीमध्ये न्यायालयाने अश्पाक संदे याच्यावर पुरवणी दोषारोप ठेवला.

दरम्यान, जिल्हा न्यायालयाच्या या निर्णयाच्या विरोधात तसेच खुनाचा कट कायना बँकेत शिजला, हा उल्लेख दोषारोपात यावा, यासाठी मूळ फिर्यादी प्रतापराव ऊर्फ महेश बबन भोसले यांच्या वतीने उच्च न्यायालयात फौजदारी रिट दाखल करण्यात आली आहे.या अर्जावर १६ मार्च रोजी सुनावणी होणार असून आता या खटल्याची जिल्हा न्यायालयातील सुनावणी पुढे ढकलण्यात आली आहे.

## सिडकोतर्फे दोन दिवस पाणीपुरवठा बंद

नवी मुंबई, ता. ११ - हेटवणे धरणाच्या मुख्य जलवाहिनीच्या दुरुस्तीचे काम सिडकोतर्फे हाती घेण्यात येणार आहे. त्यामुळे या धरणातून खारघर, उलवे परिसराला होणारा पाणीपुरवठा १२ आणि १३ मार्च या दोन दिवशी बंद राहणार आहे.

सिडकोतर्फे हेटवणे धरणातून खारघर, द्रोणागिरी, उलवे आदी परिसराला पाणीपुरवठा करण्यात येतो. मात्र मुख्य जलवाहिनीच्या दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येणार आहे. त्यामुळे उद्या सकाळी ९ वाजल्यापासून १३ मार्चच्या दुपारी ३ वाजेपर्यंत पाणीपुरवठा खंडित करण्यात येणार आहे. त्यामुळे खारघर,उलवे तसेच द्रोणागिरी परिसरात पाणीपुरवठा होणार नाही. तसचे त्यानंतर पुढील दोन दिवस कमी दाबाने पाणीपुरवठा होणार आहे. तरी या भागातील रहिवाशांनी पुरेसे पाणी साठवून पाण्याचा योग्य वापर करावा आणि सहकार्य करावे, असे आवाहन सिडकोच्यावतीने करण्यात आले आहे.

## वीरपत्नी म्हणून गौरव होतो पण सुवासिनीच्या कार्यक्रमात टाळले जाते

### श्रीमती करकरे व साळसकर यांची खंत

सातारा, ता. ११ - समाजामध्ये चांगल्या रुढी, परंपरा आहेत, परंतु काही वेळेला भुरसटलेल्या विचारामुळे सुवासिनीच्या कार्यक्रमात टाळले जाते. त्यावेळी वीरपत्नी असल्याचा गौरव क्षणात नाहिसा होतो. अशी खंत वीरपत्नी कविता करकरे व स्मिता साळसकर यांनी सातारा येथे व्यक्त केली. त्यावेळी उपस्थित महिलांनाही समाजातील दांभीकपणाची चीड आली.

शहीद वीर हेमंत करकरे व विजय साळसकर यांच्यानंतर समाजातील अनेक मान्यवरांनी दिलासा, आधार दिला. परंतु महिलांनीच सुवासिनीच्या कार्यक्रमाच्यावेळी डावलले त्यावेळी खुप वाईट वाटले. ही मानसिकता बदलण्यासाठी आता सर्वांनीच पुढाकार घेतला पाहिजे, असेही त्यांनी सांगितले. पोलीस दलामध्ये आवश्यक सुधारणा होणे गरजेचे आहे. काही अपप्रवृत्ती नष्ट केली पाहिजे. कसाबला फाशी देणे हे न्यायाची भूमिका आहे, असे त्यांनी स्पष्ट केले. या कार्यक्रमाला सौ. चित्रलेखा माने-कदम, प्रा. डॉ. अरविंद बुरूंगले, निवेदिता जोशी, उपप्राचार्य ए.बी. पवार, प्रा. सुनीता माने व मोठ्या संख्येने महिला, विद्यार्थी उपस्थित होती.

## राशी भविष्य

सोमवार, १२ मार्च २०१२

**मेष :** अवतीभोवतीच्या लोकांच्या बोलण्याकडे लक्ष देऊ नये. दुर्घटनेपासून संरक्षण होईल. राजकीय, सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घ्याल.

**वृषभ :** कायदेशीर बाबी नीट तपासून मगच योग्य निर्णय घ्यावा. दिलेली आश्वासने पाळू शकाल. प्रकृतीच्या कटकटीमुळे चांगल्या कार्यक्रमावर पाणी पडेल.

**मिथुन :** नातेवाईकांबाबत सकारात्मक दृष्टिकोन ठेवणे भाग पडेल. जोडीदाराचे समाधान करणाऱ्या गोष्टी घडतील. कनिष्ठांच्या उत्तम सहकार्यामुळे कामाचे फारसे दडपण राहणार नाही.

**कर्क :** स्वत:चे कौतुक, स्वत:चे कर्तृत्व चारचौघांना सांगण्यात धन्यता वाटेल. तुमच्या कल्पना प्रत्यक्षात साकार करण्याचे प्रयत्न यश देतील. आर्थिक अनुकूलता राहील.

**सिंह :** घरात तुमच्या वागण्यातील अरेरावी टाळावी. प्रवासात चोरी, फसवणूक या गोष्टींपासून सावध राहावे. धार्मिक समारंभात भाग घ्याल.

**कन्या :** व्यवहारात तुमची पत, प्रतिष्ठा वाढेल. तुमच्यामुळे घरच्यांना ताण निर्माण होणार नाही, याची दक्षता घेणे आवश्यक आहे. काही अनपेक्षित लाभ होतील.

**तूळ :** व्यवसायात तुमच्यात व भागीदारात गैरसमज निर्माण करण्याचे इतरांचे प्रयत्न यशस्वी होणार नाहीत. हाती आलेला पैसा योग्य गुंतवणुकीच्या दृष्टने उपयोगी पडेल, याची काळजी घ्यावी.

**वृश्चिक :** इच्छेविरुद्ध पैसे खर्च करावे लागतील. नवीन कल्पना, नवीन योजना राबवाल. सहकाऱ्यांच्या विचित्र मनोवृत्तीचे दर्शन घडेल.

**धनु :** बढाईखोर व्यक्तींपासून दोन हात दूर राहिलेले चांगले. व्यावसायिक अडचणींना व्यक्तिगत संबंधातून उत्तर सापडेल.

**मकर :** मित्रांना तुमचे यश मोठे करून सांगू नये. व्यवसायात हाताखालील व्यक्तींशी मुत्सद्दीपणाने वागणे आवश्यक ठरेल. प्रवास दगदगीचे, परंतु कार्यसाधक होतील.

**कुंभ :** पैशाच्या व्यवहारातील नुकसानीत भर पडणार नाही, याची काळजी घ्यावी. मिळालेल्या यशामुळे नवीन आत्मविश्वास निर्माण होईल. जोडीदाराच्या अपेक्षा पूर्ण करू शकाल.

**मीन :** पैशाच्या नियोजनाबाबतीत थोडे टेन्शन निर्माण होईल. वैयक्तिक कारणामुळे जोडीदाराबरोबर नाराजी निर्माण होईल. वाहने जपून चालवावीत.

- संजय मनोहर

## महाबळेश्वर तहसीलदार कार्यालयावर मनसेचे धरणे आंदोलन

महाबळेश्वर, ता.११- तालुक्याच्या तहसीलदार कार्यालयावर विविध मागण्यांसाठी महाराष्ट्र नवनिर्माण सनेने धरणे आंदोलन केले. एका हॉटेलमालकाने मोकळ्या जागेत बेकायदा मातीचा भराव टाकल्याने येथील शेकडो वृक्षांची हानी झाली आहे. यावर कारवाई करण्याबाबत तहसीलदार कार्यालयाने नोटीस बजावली आहे. याची तातडीने अंमलबजावणी करावी, या मागणीसाठी धरणे धरण्यात आले होते.

मनसेचे तालुका अध्यक्ष अनिल मोरे, जिल्हा अध्यक्ष रणजितसिंह भोसले, ॲड. विकास पवार, मुंबईचे कालिना विभाग अध्यक्ष चंदू मोरे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन झाले. यावेळी शेकडो मनसे कार्यकर्त्यांनी सहभाग घेतला होता.

## वाहनाच्या धडकेत एक जागीच ठार

सेल, ता. ११ - येथील जिंतूर रस्त्यावर एका चारचाकी वाहनाच्या जोरदार धडकेत एकजण ठार झाल्याची घटना घडली. विद्यानगर परिसरातील रहिवासी मधुकर केशवराव गुटाळ (६५) हे जिंतूर रस्त्यांच्या बाजूला एका झाडाखाली विश्रांतीसाठी थांबले असता त्यांनी एका चारचाकी वाहनाने जोराची धडक दिली. त्यात ते जागीच ठार झाले.

## महाबळेश्वर-वेण्णालेक मार्गावर अपघात! युवक जागीच ठार

कराड, ता. ११ - वेण्णा लेक मार्गावर ट्रक मार्गच्या टायरखाली आल्याने शहरातील तरुण सौरभ बंडोपंत वाईकर (२०) हा जागीच ठार झाला.सौरभ गिरिस्थान कला महाविद्यालयात टी.वाय.बी.कॉम.च्या वर्गात शिकत होता. हा ट्रक वेण्णालेकमार्गे महाबळेश्वरकडे येत असताना सौरभ त्याचा मित्र पल्सर दुचाकीवरून येत होते. दरम्यान, मारुती स्विफ्ट त्यांना ओलांडून जात असताना दुचाकीस धक्का लागून तोल गेल्याने सौरभ ट्रकच्या मागच्या चाकाखाली फेकला गेला. मात्र मागच्या चाकाखाली त्याचे डोके कसे आले समजू शकले नाही.पोलीस घटनेची चौकशी करत आहेत.

## किल्ले शिवनेरीवर छत्रपती शिवरायांची शिवजयंती उत्साहात साजरी

नारायणगाव, ता. ११ - महाराष्ट्राचे प्रेरणास्थान असणाऱ्या छत्रपती शिवरायांची तिथीप्रमाणे शिवजयंती शिवसेनेचे कार्याध्यक्ष उध्दव ठाकरे यांच्या उपस्थित मोठ्या उत्साहात साजरी झाली.

शिवसेनेचे कार्याध्यक्ष उध्दव ठाकरे यांनी शिवनेरीवर बालशिवबा व जिजाऊंच्या शिल्पाला त्यांनी अभिवादन करून शिवजयंती साजरी झाली. मुबंईचे नवनिर्वाचित महापौर सुनील प्रभु, खासदार शिवाजी आढळराव, शिवसेनेचे पुणे जिल्हाप्रमुख बाबासाहेब धुमाळ, उपजिल्हाप्रमुख उमेश चांदगुडे, संभाजी तांबे, शिवसेना गटनेत्या आशाताई बुचके, शरद चौधरी, जुन्नरचे नगराध्यक्ष अनिल मेहेर उपनगराध्यक्ष श्याम पांडे, मधुकर काजळे, राम गावडे व शिवसेनेचे नवनिर्वाचित नगरसेवक आणि जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी शिवसेनेचे कार्याध्यक्ष उध्दव ठाकरे हे शिवनेरी किल्यावर येऊन शिवरायांना अभिवादन करून प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधीशी थोडक्यात बोलून पुन्हा मुबंईला रवाना झाले. अवघा अर्धातास दिलेल्या भेटीमुळे शिवसेनेच्या कार्यकत्यांचा चांगलाच हिरमोड झाला. उध्दव ठाकरे शिवनेरीवर येणार म्हणून सर्व शिवसैनिकांनी सकाळपासूनच एकच गर्दी केली होती. परंतू त्यांची भेट न होऊ शकल्यामुळे त्यांच्यामध्ये चांगलीच नाराजी दिसून येत होती. कारण जुन्नर तालुक्यात जुन्नरच्या नगरपरिषदेवर आणि पंचायत समितीवर भगवा फडकल्यामुळे ते शिवनेरी किल्याच्या पायथ्याशी आयोजीत किलेल्या जाहीर सभेला उपस्थित राहतील व विविध विकास कामांचे उद्‌घाटन ही त्यांच्या हस्ते आयोजित केलेले होते. परंतू उध्दव ठाकरे हे किल्यावरूनच पुन्हा मुबंईला रवाना झाल्यामुळे शिवसैनिकांनमध्ये नाराजी दिसून येत होती.

सकाळी शिवाई मातेला नगराध्यक्ष अनिल मेहेर यांच्या हस्ते सपत्नीक पूजा व अभिषेक करण्यात आला. शिवाई माता मंदिरापासून शिवजन्मस्थळापर्यंत शिवप्रतिमेची पालखीतून मिरवणूक काढण्यात आली. तसेच शिवकुंज स्मारकात शिवस्फूर्तीपर पोवाड्यांचा कार्यक्रम सादर करण्यात आला. यावेळी समितीच्या वतीने देण्यात येणारा राजमाता जिजाऊ पुरस्कार कौसल्या फाफाळे यांना देण्यात आला.




'आई मला मारू नकोस' या नव्या चित्रपटाची सध्या जोरदार चर्चा चालू आहे. पहिला थ्रीडी मराठी चित्रपट म्हणून या चित्रपटाचे प्रेक्षकात कुतूहल निर्माण झालेले आहे. या अनोख्या उपक्रमाचे साक्षीदार होण्याचे भाग्य या चित्रपटाचे गायक, संगीतकार, गीतकार श्रीहरी वझे यांना लाभलेले आहे. प्रेक्षकांकडून या चित्रपटाचे स्वागत झाले आहेच, परंतु वझे यांचीसुद्धा या निमित्ताने प्रतीक्षा थांबलेली आहे. या एका चित्रपटाने त्यांना दोन हिंदी, दोन मराठी चित्रपट मिळवून दिलेले आहेत. त्यामुळे 'श्रीहरी यांची वारी अधिक सुरेली' होणार आहे. त्यामुळे अनेक वर्षांचा संगीतप्रवास सार्थकी ठरल्याचे समाधान त्यांना वाटते. वझे यांचा हा प्रवास फक्त चित्रपटापूरती मर्यादित न राहता अल्बम, रिॲलिटी शोपर्यंत राहिलेला आहे. ते स्वतः स्वामीभक्त आहेत. त्यामुळे 'ब्रम्हांडनायक' या अल्बमच्या निमित्ताने ते महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचलेले आहेत. मातृवंदना, मंगलप्रभात हे त्यांचे अल्बम अनेकांच्या घरात संग्रही असल्याचे पहायला मिळते. शाम बेनेगल यांनी आपल्या 'जनजन प्रकाश-मनमन प्रकाश' या हिंदी टेलिफिल्मसाठी त्यांचा संगीतकार म्हणून वापर केलेला आहे. त्यामुळेच 'अब तो जीना तेरे बिन' हा त्यांचा सुरेश वाडकर यांनी गायिलेला अल्बम प्रचंड लोकप्रिय झाला होता. आकाशवाणी मान्यताप्राप्त असलेल्या या गायकाने ऐन उमेदीत 'राग एक रंग अनेक' या रिॲलिटी शो मध्ये स्वतःचा प्रभाव दाखवून महाराष्ट्रातल्या तमाम प्रेक्षकांचे लक्ष आपल्याकडे वेधून घेतले होते. अजित कडकडे, सुरेश वाडकर, साधना सरगम, शंकर महादेवन, श्रेया घोषाल, वैशाली सामंत अशा कितीतरी दिग्गजांबरोबर काम करण्याची संधी वझे यांना मिळालेली आहे. आता ही संधी आणखीन गतिशील होणार आहे.

## व्यापाऱ्यांवरील हल्ल्याचे फलटणमध्ये पडसाद

कराड, ता. ११ - फलटण येथील सराफ अशोक रतनचंद गांधी यांच्यावर हल्ला करून त्यांना लुटण्याचा प्रयत्न झाल्याच्या प्रकाराचे शहरात गंभीर पडसाद उमटले असून शुक्रवार ९ सकाळपासून व्यापाऱ्यांनी बाजारपेठ बंद ठेवली होती. संशयितांना त्वरित अटक करावी व व्यापाऱ्यांना संरक्षण मिळावे, या मागणीसाठी पोलीस ठाण्यावर मोर्चा काढण्यात आला तर व्यापारी महासंघ व मानवी हक्क संघटनच्या पदाधिकाऱ्यांनी पोलीस उपअधीक्षकांना निवेदन दिले.

## चंद्रपूरमध्ये विहिरीत दोन रानगवे पडले

चंद्रपूर, ता. ११ - जिल्ह्यामध्ये एका विहिरीमध्ये दोन रानगवे पडेल. बराच वेळ हे रानगवे विहिरीबाहेर पडण्याचा प्रयत्न करीत होते. ग्रामस्थांनीही त्यांना बाहेर काढण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यांना अपयश आले. शेवटी ३६ तासांनंतर वनखात्याचे पथक घटनास्थळी रवाना झाले. क्रेनच्या सहाय्याने विहिरीसंलग्न खोदकाम करून हे रानगवे बाहेर काढण्यात वन कर्मचाऱ्यांना यश आले.

# दारिद्र्य- रेषेखालील यादीतून नऊ दलित कुटुंबांची नावे वगळली

सिंधुदुर्ग, ता.११- कुटुंबाच्या दारिद्र्य-रेषेखालील यादीतून नावे वगळल्याचा जाब दोडामार्ग तालुक्यातील साटेली-कदमवाडीतील एकूण ९ दलितांनी दोडामार्ग गट विकास अधिकारी डी.एन्. गुंजाळे यांना विचारून धारेवर धरले. खरोखर दारिद्र्य-रेषेखाली असताना यादीतून नाव वगळण्यात का आले? असा सवाल वेळोवेळी या कुटुंबियांना स्थानिक साटेली ग्रा.पं.ला केला होता. परंतु त्यांच्याकडून समर्पक उत्तर न मिळाल्याने त्यांनी पं.स. गट विकास अधिकाऱ्यांना घेरले. येत्या मार्च-एप्रिलदरम्यान शासनाच्या दारिद्र्य-रेषेखालील यादीचे सर्वेक्षण होणार असून त्यावेळी वगळण्यात आलेल्या कुटुंबियांनी माघार घेतली.

दोडामार्ग तालुक्यातील साटोली- कदमवाडीतील या दलित कुटुंबियांच्या नावे जमीन वा अन्य मालमत्ता यादी तसेच आर्थिक बाजू कमकुवत असताना त्यांची अचानक दारिद्र्य-रेषेखालील या यादीतून नावे वगळण्यात आली.

२००२ च्या सर्वेक्षणानुसार दारिद्र्य-रेषेखालील यादीतून ही नावे वगळल्यामुळे गेली १० वर्षे ही कुटुंबे शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवत आहेत. स्थानिक साटेली-भेडसी ग्राम पंचायत कार्यालयाने आमच्याकडे काही नाही, अशी भूमिका घेतल्याने संतप्त कुटुंबियांनी पंचायत समितीत धडक दिली.

यामध्ये द्रौपदी कदम, लीलावती कदम, नर्मदा कदम, कृष्णा कदम, बुधाजी कदम यांच्यासह भारिपचे दोडामार्ग तालुकाध्यक्ष सुरेश जाधव, कृष्णा जाधव आदी उपस्थित होते. दोडामार्ग तालुक्यात बऱ्याच दारिद्र्य-रेषेखालील कुटुंबांना यादीतून वगळण्यात आल्याच्या तक्रारी असून नव्या सर्वेक्षणात त्यांची नावे नोंदविण्यात यावी, अशी मागणी होत आहे.

## विदर्भात चार शेतकऱ्यांची आत्महत्या

नागपूर, ता.११- कापूस निर्यात बंदी घालण्यात आल्याने कापसाची विक्री होत नसल्याने त्याचा फटका शेतकऱ्यांना बसला आहे. कापूस विक्री होत नसल्याने निराश झालेल्या विदर्भातील चार शेतकऱ्यांनी आत्महत्या करून जीवनयात्रा संपवली आहे. शंकर वैद्य (रा. बोरजई, यवतमाळ), शेषराव राजपल्लू (रा. सावंगा, यवतमाळ), निळकंठ मान्दाडे (रा. घरेगाव, जि. गोंदिया), बापूराव उमप (रा. शेंदोळा, जि. अमरावती) अशी आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची नावे आहेत. कापसावर निर्यातबंदी घातल्याने त्याचे विपरीत परिणाम जाणवत आहे. त्यामुळे कापसावरील निर्यातबंदी उठवण्याची मागणी विदर्भ जनआंदोलन समितीने केली आहे.

## भीषण आगीमध्ये ७५० कलमे खाक

देवगड, ता. ११- देवगड तालुक्यातील पाळेकरवाडी सडा भागात विद्युत वाहिनीच्या शॉर्टसर्किटमुळे मोठी आग लागली. या भीषण आगीमध्ये सुमारे १०० एकर क्षेत्रामधील ७५० कलमे होरपळून लाखोंचे नुकसान झाले आहे. गेल्या काही दिवसांपासून या भागात वीजवाहिन्या ओढण्याचे काम सुरू आहे.

## सेलू-जिंतूर अंगणवाडी भरती- प्रक्रियेचा मार्ग मोकळा

सेलू, ता. ११- सेलू व जिंतूर तालुक्यातील रखडलेली अंगणवाडीसेविका मदतनीस निवड- प्रक्रिया आता लवकरच सुरू होणार आहे. युवक काँग्रेसच्या तथा जि. प. सदस्या मेघना बोर्डीकर-साकोरे यांनी नुकतीच मुख्यमंत्री यांची भेट घेऊन या भरतीवरील स्थगिती उठविण्यासाठी पाठपुरावा केला होता. परभणी जिल्ह्यातील गंगाखेड, पूर्णा व पाताम या तालुक्यांतील अंगणवाडी भरती- प्रक्रिया पूर्ण झाली होती. फक्त सेलू व जिंतूर तालुक्यांतील भरती- प्रक्रिया राजकीय चक्रामुळे रखडली होती. परंतु जिल्हा परिषद निवडणुकीत मेघना बोर्डीकर यांनी ही भरती- प्रक्रिया सुरू करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार त्यांनी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांची मुंबई येथे जाऊन या भरती- प्रक्रियेसंदर्भात चर्चा केली असता, मुख्यमंत्री चव्हाण यांनी स्थगिती उठविण्याचे आदेश दिले. याबद्दल मेघना बोर्डीकर यांनी मुख्यमंत्र्यांचे आभार व्यक्त केले. त्यांच्यासोबत बोरीचे उपसरपंच पंडित घोलप, नागसेन भेरजे, सेलू तालुका काँग्रेसचे अध्यक्ष नामदेव डरव व अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.

## साडे आठलाखाचे ब्राऊन शुगर जप्त

पुणे, ता. ११ - अंमली पदार्थविरोधी पथकाने सुमारे ८ लाख ६४ हजार रुपये किमतीचे ब्राऊन शुगर (हेरॉइन) जप्त केले आहे. याप्रकरणी मनोज मांगीलाल कांवरा (वय, २२) याला अटक केली आहे. पोलीस निरीक्षक सतिश देवरे यांच्या पथकाने ही कारवाई केली. याबाबत अधिक माहिती अशी की, औंधगाव येथील जकात नाक्याजवळील जयभवानी स्नॅक सेंटरसमोर एक इसम ब्राऊन शुगर विक्रीसाठी घेऊन येणार असल्याची माहिती बातमीदाराकडून पोलिसांना मिळाली. पोलिसांनी परिसरात सापळा लावला. त्यावेळी मनोज हा संशयास्पद फिरत असल्याचे आढळून आले. पोलिसांनी त्याची झडती घेतली असता, एका कॅरीबॅग मध्ये ७२० ग्रॅम अमली पदार्थ असल्याचे उघडकीस आले.

## मुरबाडमध्ये जुगारावर धाड

मुरबाड, ता. ११-मुरबाड शहरातील सुशिक्षित समजल्या जाणाऱ्या गणेशनगरमधील होळीच्या पूर्वसंध्येला मुरबाड पोलिसांनी जुगारावर धाड टाकून जुगार खेळणाऱ्यांवर मुंबई जुगार ॲक्ट १२ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला.

गणेशनगरमधील संभाजी पाटील यांच्या घराच्या गच्चीवर जुगार सुरू असल्याची माहिती मुरबाड पोलिसांना मिळताच सापळा रचून जुगार खेळणाऱ्यांना अटक केली. यामध्ये संभाजी तोताराम पाटील, संतोष भंड्ड, महादू गोरले, सुभाष तांबेकर, अजय धुर्वे यांच्यावर कारवाई करत ७६० रु. मुद्देमाल जमा करण्यात आला. मात्र शहरातील मोठ्या प्रमाणातील नोकरवर्गाचा पसंतीचा भाग तसेच मोठ्याप्रमाणात शिक्षक, व्यापारी व अधिकारीवर्ग रहात असलेल्या भागात झालेल्या या कारवाईची सर्वत्र चर्चा सुरू आहे.

## नाशिकचे जिल्हा आरोग्य अधिकारी निलंबित

नाशिक, ता. ११ - नाशिक जिल्ह्यातील जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्रदीप राठोड यांना निलंबित करण्यात आले आहे. राठोड यांनी जिल्हा आरोग्य सेवा भरती, पैसे घेऊन केल्याचा त्यांच्यावर आरोप होता. याप्रकरणी चौकशीमध्ये राठोड हे दोषी आढळून आले होते. त्यानंतर राठोड यांना तडकाफडकी निलंबित करण्यात आले. राठोड यांनी केलेली भरतीही पुन्हा होण्याची शक्यता आहे.

# अंगणवाडीसेविका मदतनीस निवड-प्रक्रिया लवकरच सुरू

सेलू, ता. ११ - सेलू-जिंतूर तालुक्यातील रखडलेली अंगणवाडीसेविका मदतनीस निवड-प्रक्रिया आता लवकरच सुरू होणार आहे. युवक काँग्रेसच्या तथा जि. प. सदस्या मेघना बोर्डीकर-साकोरे यांनी नुकतीच मुख्यमंत्री यांची भेट घेऊन या भरतीवरील स्थगिती उठविण्यासाठी पाठपुरावा केला होता.

परभणी जिल्ह्यातील गंगाखेड, पूर्णा व पाताम या तालुक्यातील अंगणवाडी भरती-प्रक्रिया पूर्ण झाली होती. फक्त सेलू-जिंतूर तालुक्यातील प्रक्रिया राजकीय चक्रामुळे रखडली होती. परंतु जिल्हा परिषद निवडणुकीत मेघना बोर्डीकर यांनी ही भरती-प्रक्रिया सुरू करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार त्यांनी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांची मुंबई येथे जाऊन या भरती-प्रक्रियासंदर्भात चर्चा केली असता, मुख्यमंत्री चव्हाण यांनी स्थगिती उठविण्याचे आदेश दिले. याबद्दल मेघना बोर्डीकर यांनी मुख्यमंत्र्यांचे आभार व्यक्त केले. त्यांच्या सोबत बोरीचे उपसरपंच पंडित घोलप, नागसेन भेरजे, सेलु तालुका काँग्रेसचे अध्यक्ष नामदेव डख व अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.

## मासे खाल्ल्याने मेंदू तरुण, ताजातवाना राहतो

कॅलिफोर्निया, ता. ११- कॅलिफोर्निया विद्यापीठातील संशोधकांनी केलेल्या संशोधनानुसार मासे खाल्ल्याने माणसाचा मेंदू तरुण आणि ताजातवाना राहतो असा निष्कर्ष काढला आहे. त्याचप्रमाणे हृदयविकाराचा झटका रोखण्यासाठीही मासे खाणे हिताचे ठरते. माशाच्या तेलामध्ये 'ओमेगा-३' हे रक्तप्रवाह सुरळीत करणारे फॅटी ॲसिड मोठ्या प्रमाणात असते.

# मुंबईने कोकणचा विकास करण्याची गरज आहे

सिंधुदुर्ग, ता.११- मुंबई कोकणची आहे, परंतु मुंबईने कोकणचा विकास करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन सोलापूर विद्यापीठाच्या भूगोल अभ्यासक्रम समितीचे अध्यक्ष डॉ. बी.एम. गोफणे यांनी केले.ते 'कोकण विकास' या विषयावर दोन दिवसांच्या राष्ट्रीय परिषदेत बोलत होते. ही परिषद सावंतवाडी येथे संपन्न झाली.

आय.सी.एस.एस.आर. मुंबई पुरस्कृत व कोकण नॉग्राफी असोसिएशन व पंचम खेमराज महाविद्यालय, सावंतावडीच्या भूगोल विभागाच्या संयुक्त विद्यमाने या राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेस गोवा, गुजरात, कर्नाटक व महाराष्ट्रातून संशोधक आले होते. यावेळी भूगर्भतज्ज्ञ डॉ.एम.आर. प्रभू, दक्षिण रत्नागिरी शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव एम्. डी.देसाई, डॉ. एम.एस.पेडणेकर, प्रणव राऊत (मुंबई) आदी उपस्थित होते.

प्रास्ताविक व स्वागत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी.एस्. भारमल यांनी केले. कोकण जिओग्राफी असो. चे अध्यक्ष प्रा. डॉ. एस.ए. अंकूर यांनी चर्चासत्राचा उद्देश स्पष्ट केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सौ.एम.डी.धुरी व प्रा. सौ. सुमेधा धुरी यांनी तर आभार प्रा.एस्. एस.बुवा यांनी मानले.

## पंचगंगेत मृत माशांचा खच!

कोल्हापूर, ता. ११- जिल्ह्यातील साखर कारखान्यांनी पंचगंगा नदीत मळी सोडल्यामुळे नदीतील पाण्यात मोठ्या प्रमाणात मासे मेले असून त्याचा खच अनेक ठिकाणी दिसत आहे. मात्र या मृत माशांमुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका संभवत नसल्याचे सरकारी अधिकाऱ्यांनी सांगितले.

• १०वी/१२वी - पास / नापास ? • I.T.I प्रवेश नाही ?
• मेकॅनिकल / सिव्हील / आर्कीटेक्चरल / पाईपिंग ड्राफ्टसमन • इंटिरियर
• सिव्हील सुपरवायझर • इलेक्ट्रीशियन • टिव्ही / डिव्हीडी / मोबाईल रिपेअरींग
• मोटर / डिझेल मेकॅनिक • टर्नर / फिटर / वेल्डर • पाईप फिटर
• CAD - CAM - CNC प्रोग्रॅमिंग • रेफ्रिजरेशन / A.C • इन्स्ट्रुमेंटेशन
• कॉम्प्युटर सॉफ्टवेअर / हार्डवेअर / नेटवर्किंग Sunday Batches
• I.T.E.S. Diploma Courses. MS-CIT
• FACILITY MANAGEMENT (B.M.S.) COURSE
४ दशकांची उज्वल परंपरा www.ieithane.in
इंडस्ट्रियल इंजिनिअरींग इन्स्टिट्यूट,
अशोक टॉकीजच्या मागे, दत्त मंदिर आणि स्टेशन जवळ, ठाणे (प.)
25334467 / 9920249649 / 9323515480
Mahad Branch - 9850737069

# कोल्हापूर पालिकेचा ३ कोटी २६ लाखाचा शिलकी अर्थसंकल्प स्थायीला सादर

कोल्हापूर, ता.११- 'विकास बदलत्या कोल्हापूरचा' हे घोषवाक्य समोर ठेवून सन २०१२-१३ चा नवीन अर्थसंकल्प कोल्हापूर पालिकेच्या आयुक्त विजयालक्ष्मी प्रसन्ना बिदरी यांनी स्थायी समितीस सादर केला. ही माहिती आयुक्तांनी पत्रकार परिषद घेऊन दिली. १०१२-१३ च्या अर्थसंकल्पीय अंदाजात अव्वल शिलकेसह महसुली व भांडवली जमा रक्कम रुपये २५५ कोटी, ९१ लाख, ५२ हजार ८०३/- इतकी अपेक्षित असून अपेक्षित खर्च २५४ कोटी, ६५ लाख, १७ हजार वजा जाता १ कोटी २६ लाख ८०३ इतकी शिल्लक अपेक्षित असल्याचे आयुक्तांनी सांगितले.

२०११-१२ या आर्थिक वर्षात मनपाला महसुली उत्पन्न प्राप्त करताना मोठ्याप्रमाणात अडचणी आल्या. जकात बंद आणि स्थानिक संस्था कराला व्यापाऱ्यांनी केलेला विरोध या कारणामुळे मनपाला यंदा अपेक्षित उत्पन्नाचे उद्दिष्ट गाठता आलेले नाही. त्यामुळे पालिकेचे उत्पन्न मोठ्याप्रमाणात घटले आहे, असे आयुक्त विजयालक्ष्मी प्रसन्ना बिदरी यांनी स्पष्ट केले.

## भिवंडीत अपक्षांना महायुतीत घेऊन सत्ता स्थापन करू - रामदास आठवले

भिवंडी, ता. ११ - एप्रिल महिन्यात होऊ घातलेल्या शहर महानगरपालिकेच्या निवडणूक पार्श्वभूमीवर रिपाइं नेते रामदास आठवले यांनी प्रेमनगर येथे रिपाइं शहर कार्यालयाचे उद्घाटन केले. यावेळी आमदार रूपेश म्हात्रे, भाजपाचे साईनाथ पवार, निलेश चौधरी, शिवसेना उपजिल्हाप्रमुख सुभाष माने, रिपाइं अल्पसंख्याक प्रदेश अध्यक्ष जमाल अंसारी, उपाध्यक्ष अनवर निरबान, रिपाइं शहर संघटक सोपान म्हस्के, महिला संघटक पद्मा जोगीन, सविता नागपूरे, आशा पवार, संध्या सरदार आदी उपस्थित होते. त्यावेळी पत्रकारांच्या प्रश्नांना उत्तर देताना त्यांनी सांगितले की भिवंडी शहरात अपक्ष उमेदवार निवडून येण्याचा इतिहास आहे. तर शिवसेना, भाजपा, रिपाइं या महायुतीला सत्ता स्थापन करण्यासाठी अपक्षांची गरज लागली तर अपक्षांना महायुतीत सहभागी करून सत्ता स्थापन करू.

# सेलूच्या मुख्याधिकाऱ्यांकडून महिला कर्मचाऱ्यांचा मानसिक छळ

सेलू, ता. ११ - येथील नगर परिषदेचे मुख्याधिकारी सूर्यकांत पाठक हे काही कर्मचाऱ्यांचे एकून हेतूपुरस्कर चुकीच्या नोटिसा देऊन विनाकारण मानसिक त्रास देत असल्याची तक्रार न. प. च्या कार्यालयीन अधीक्षक व ज्येष्ठ महिला कर्मचारी सौ. आशा दीक्षित यशांनी परभणीचे जिल्हाधिकारी डॉ. शालीग्राम वानखडे यांच्याकडे केली आहे. सौ. आशा दीक्षित या ११७७ मध्ये अनुकंपा तत्त्वावर लिपिक या पदावर सेलू नगर परिषदमध्ये नियुक्त झाल्या.

न.प. मधील सर्व विभागात त्यांनी यशस्वी सेवा केली असून ३ वर्षांपूर्वीचे त्या कार्यालयीन अधीक्षक पदावर नियुक्त आहेत. विशेष म्हणजे, ३६ वर्षाच्या सेवेतील कालावधीत त्यांना एकाही मुख्याधिकाऱ्यांने आधी नोटिससुद्धा दिली नाही. उलट त्यांनी चांगले काम केल्याबद्दल उत्कृष्ट असे सी. आर. व प्रशस्तीपत्रक दिले आहे. आता मुख्याधिकारी पाठक मात्र हे इतर कर्मचाऱ्यांचे ऐकून सौ. आशा दीक्षित यांना नाहक त्रास देत असून हेतूपुरस्कर चुकीच्या नोटिसा देऊन संपिका तयार करून एकप्रकारे मानसिक त्रास करीत आहेत. त्यांच्या दिवसेंदिवस वाढलेल्या त्रासाला कंटाळून शेवटी सौ. दीक्षित यांनी जिल्हाधिकारी परभणी व महिला आयोगाकडे रितसर तक्रार दिलेली आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका

घनकचरा व्यवस्थापन (प.ऊ.)

**शुद्धिपत्रक**

**विषय :-** दोन वर्षांच्या कालावधीकरिता झोन १ ते ७च्या विभागांकरिता भाडेतत्त्वावर पी.सी.ओ. व्हॅनची सेवा पुरवण्यासाठी

**संदर्भ :-** ई-निविदा नियत तारीख ०७.०३.२०१२

वरील संदर्भित ई-निविदेमध्ये कृपया खालील बदल वाचण्यात यावेत :

| पूर्वीच्या अटी | सुधारित अटी |
|---|---|
| अ) चालकाच्या केबिनचे खालीलप्रमाणे अंदाजे मोजमाप असावे :<br>लांबी : १७५० मिमी<br>रुंदी : १७५० मिमी<br>उंची (अंतर्गत) : १६७० मिमी<br>ब) चालकाच्या बाजूचा एक दरवाजा, अटेन्डन्ट/जे.ओ.च्याबाजूचा एक दरवाजा आवश्यक. | अ) चालकाची केबिन चालकासहित एक अटेन्डन्ट/जे.ओ. बसण्यास पुरेशी असावी.<br>ब) चालकाच्या बाजूचा एक दरवाजा, अटेन्डन्ट/जे.ओ.च्याबाजूचा एक दरवाजा आवश्यक. |
| निविदा सादर करणाऱ्या जॉइंट व्हेंचरना परवानगी नाही. | निविदा सादर करणाऱ्या जॉइंट व्हेंचरना परवानगी आहे. |
| ई-निविदेची नियत तारीख ०७.०३.२०१२ आहे. | ई-निविदेची नियत तारीख १३.०३.२०१२ आहे. |

सही/-
मुख्य अभियंता (घ.क.व्य.)

पीआरओ/१०२९/जाहि./२०१२/शुद्धि.

रेन वॉटर हार्वेस्टिंग हाच पाणी टंचाईवर उपाय

**PUBLIC NOTICE**
RAJUL 'A' CO-OPERATIVE HOUSING SOCIETY LTD.
[ REGD NO.MUM/WD/HSG/TC /8235/2001-2002]
9,Harkness Rd, Malabar Hill, Mum- 06.

MRS RANJAN H SHAH, owner of 1/3rd share in Flat no 1403 in Rajul 'A' Co-operative Housing Society Ltd having address at 9, Harkness Road, Malabar Hill, Mumbai – 400 006 died on 13.10.2011 without making a nomination. Her legal heir MR PARAS H SHAH has applied for membership of the society and property rights in the said 1/3rd share of Flat no 1403 and Share Certificate no 9 bearing distinctive numbers from 41 to 45 [both inclusive] . The society hereby invites claims/ objections from the heirs for transfer of shares & interest of the deceased member in the capital / property of the society within a period of 15 days from the publication of this notice with all necessary documents & proof. If no claim/objections are received within the period prescribed above, the society shall be free to deal in such manner as is provided under the bye-laws of the society. A copy of the registered bye-laws of the society is available for inspection in the society office between 10.30 a.m. to 11.30 a.m. till the expiry of notice period.

For Rajul 'A' Co-operative Housing Society Ltd.
Sd/-
Hon. Secretary

**नमूना १**
**(निवडणुका घेण्याबाबतचे नियम, १९६१ यातील नियम ३ पहा)**
**निवडणुकीची सूचना**
**राज्यसभेसाठी द्विवार्षिक- निवडणूक**

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की,

१. महाराष्ट्र विधानसभेच्या निवडून आलेल्या सदस्यांकडून **सहा सदस्यांची** राज्यसभेसाठी निवडणूक घ्यावयाची आहे.
२. नामनिर्देशन पत्रे उमेदवाराला किंवा त्याच्या सूचकाला **डॉ. अनंत ना. कळसे, प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय व निवडणूक निर्णय अधिकारी किंवा श्री. गोपाळ दळवी, अवर सचिव (समिती), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय व सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यापुढे दिनांक १९ मार्च, २०१२** पर्यंत कोणत्याही दिवशी (सार्वजनिक सुट्टी व्यतिरिक्त) सकाळी ११.०० ते दुपारी ३.०० वाजेपर्यंत, कक्ष क्रमांक १४५, पहिला मजला, विधानभवन, बॅकबे रेक्लमेशन, मुंबई- ४०० ०३२ येथे दाखल करता येतील.
३. नामनिर्देशनपत्रे वर उल्लेख केलेल्या ठिकाणी व वेळी मिळू शकतील.
४. नामनिर्देशनपत्रांची छाननी दिनांक २० मार्च, २०१२ रोजी दुपारी १२.०० वाजता, कक्ष क्रमांक १४५, पहिला मजला, विधान भवन, बॅकबे रेक्लमेशन, मुंबई-४०० ०३२ येथे करण्यात येईल.
५. उमेदवारी मागे घेण्याबद्दलची सूचना उमेदवाराला किंवा ती सूचना देण्याचे लेखी अधिकार उमेदवाराकडून देण्यात आलेल्या त्याच्या सूचकाला किंवा निवडणूक एजंटला वरील परिच्छेद (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास त्यांच्या कार्यालयात दिनांक २२ मार्च, २०१२ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत देता येईल.
६. निवडणूक लढविली गेल्यास दिनांक ३० मार्च, २०१२ रोजी सकाळी ९.०० ते सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत मतदान घेण्यात येईल.

**ठिकाण: विधान भवन, बॅकबे रेक्लमेशन, मुंबई- ४०० ०३२**
**दिनांक: १२ मार्च २०१२**

सही/-
**डॉ. अनंत ना. कळसे,**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय व निवडणूक निर्णय अधिकारी**

डीजीआयपीआर/२०११-२०१२/३९१७

बृहन्मुंबई महानगरपालिका

क्र. डीवाय.सीएच.ई./६४५२/एसडब्ल्यूडी/डब्ल्यूएस दि. ०९.०३.२०१२

**ई-निविदा सूचना**

बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त खालील कामांकरिता खालील कंत्राटदारांकडून लिफाफा 'ए' 'बी' व 'सी' मधून नगवार दराने ई-निविदा मागवीत आहेत.

अ) कामासमोर निर्देशित वर्गातील बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे नोंदणीकृत. ब) तत्सम वर्गात राज्य सरकार, सैन्य अभियंतासेवा वा अन्य सरकारी संघटनांकडे नोंदणीकृत व तत्सम प्रकारची कामे केलेले.

निविदा प्रत बृ.मुं.मनपाचे पोर्टल (http://portal.mcgm.gov.in) वरून ई-प्रापण विभागांतर्गत डाऊनलोड करता येऊ शकतील.

बृ.मुं.मनपाकडे नोंदणीकृत असलेल्या तसेच नसलेल्या अशा सर्व इच्छुक व्हेंडर्सनी बृ.मुं.मनपाकडे ई-प्रापणाकरिता नोंदणीकरण करवून घ्यावे व ऑनलाइन बोली प्रक्रियेत सहभागासाठी लॉग इन अर्हता प्राप्त करावी. यासंदर्भातील तपशील वरील निर्देशित पोर्टलवर ई-प्रापण टॅबअंतर्गत उपलब्ध आहे.

नोंदणीकरणाकरिता, डिजिटल स्वाक्षरी प्रमाणपत्र तथा युजर मॅन्युअलच्या नामांकनासाठी कृपया ई-टेंडरिंग टॅबमध्ये उपलब्ध आवश्यक लिंक्सचे पालन करावे. वेंडर्स सेफस्क्रिप्ट, आयडीआरबीटी, नॅशनल इंफॉर्मेटिव सेंटर, टीसीएस, कस्टम्स, एमटीएनएल, जीएनएफसी तथा ई मुद्रा सीए आदि प्रमाणित प्राधिकरण (सीए)यांच्याकडून जे प्रमाणित प्राधिकारी आहेत त्यांच्याकडून डिजिटल स्वाक्षरी प्राप्त करू शकतात.

| अ. क्र. | कामाचे वर्णन | अंदाजित मूल्य ₹. | इ.र.ठे.ची रक्कम (₹.) | वर्ग | कामाचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १. | सन २०१२-१४ करीता पश्चिम उपनगर क्षेत्राकरिता विनिर्देशांनुसार येणाऱ्या व जाणाऱ्या वाहनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आक्सा रिफ्युज डिस्पोजल साइट/डम्पिंग ग्राऊंड येथे सी.सी.टी.व्ही. कॅमेरा रेकॉर्डिंग सीस्टीमची सेवा भाड्याने घेणे, यामध्ये जेसीबी व डम्पर्सच्या सहाय्याने माती, डेब्रिज आदींचे कटिंग, डोझिंग व समतलीकरणाकरिता बुलडोझरची सेवा पुरवण्याचा समावेश. | ३,५३,१७,५००/- | ३,५३,१७५/- | एए यांत्रिकी व विद्युत श्रेणी | २४ महिने (पावसाळा समाविष्ट) |

मान्यताप्राप्त बँकांकडून पेमेन्ट ऑफ टेंडर फीस अनुभागांतर्गत ई-निविदा प्रक्रियेद्वारे प्रत्येक प्रतीसाठी २०,०००/- + ५ % व्हॅट अशी एकूण ₹२१०००/- रकमेच्या प्रदानापश्चात बृ.मुं.मनपाच्या पोर्टलवरून रिक्त ई-निविदा प्रपत्रे डाऊनलोड करता येऊ शकतील.

इरठेची रक्कम बृ.मुं.मनपा विभाग कार्यालयांतील कोणत्याही सीएफसी केंद्रावर कार्यालयीन वेळेत जमा करावी. निविदा सादरीकरणाच्या नियत तारीख व वेळेपर्यंत ई-बोलीदारांकडून अधिकृत वापरकर्त्यांद्वारे डिजिटल स्वरूपात स्वाक्षरीत सीस्टीम निर्मित ई-चलानसंदर्भातील प्रदान सीएफसीमंध्ये स्वीकारण्यात येईल. लिफाफा 'ए' मध्ये पावतीची स्कॅन केलेली प्रत अपलोड करावी. कोणत्याही निविदाकार/कन्सॉर्टिअमकरिता स्थायी जमेतून सवलत लागू नसेल.

लिफाफा 'ए' व लिफाफा 'बी' मध्ये ई-निविदा प्रक्रियेनुसार सर्व प्रमाणित अर्हता दस्तावेज असावेत व लिफाफा सी मध्ये ई-निविदा प्रक्रियेनुसार त्यांचे संबंधित प्रस्ताव असावेत.

ई-निविदा अपलोड करण्याच्या तसेच ई-निविदा उघडण्याच्या तारखा व वेळा खालीलप्रमाणे :

| | |
|---|---|
| ई-निविदा विक्रीच्या सुरुवातीची तारीखः | दि. १२.०३.२०१२ |
| ई-निविदेचे विक्रिचा अंतिम दिनांक : | दि. १९.०९.२०१२ रोजी स.११.०० पर्यंत |
| ई-निविदेचे सादरीकरण : | दि. १९.०३.२०१२ रोजी दु. १.०० पर्यंत |
| लिफाफा ए व बी उघडणे : | दि. १९.०३.२०१२ रोजी दु. २.०० पर्यंत |
| लिफाफा सी उघडणे : | दि. २२.०३.२०१२ रोजी दु. २.०० वा. |

निविदापूर्व सभेचे आयोजन दि. १४.०३.२०१२ रोजी दु. ३.०० वाजता उपमुख्य अभियंता (घ.क.व्य.) यांच्या चेंबरमध्ये करण्यात येईल.

निविदाकारांना कोणतेही कारण न देता कोणतीही वा सर्व ई-निविदा रद्द करण्याचा अधिकार मनपा आयुक्तांकडे राखून आहे.

तपशील बृ.मुं.मनपाची वेबसाइट http://portal.mcgm.gov.in वर उपलब्ध आहे.

सही/-
उपमुख्य अभियंता
(घ.क.व्य.) प.उ.

पीआरओ/१०८२/जाहि./२०१२

पाणी वाचवा, पाणी मौल्यवान आहे

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर
नवाकाळ
।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

# मनाच्या शांततेसाठी ध्यान आणि विपश्यना

आजच्या धकाधकीच्या जीवनामध्ये मनुष्य शांततेचा शोध घेत आहे. शांततेतून निर्भेळ आनंद प्राप्त करण्याची त्याची इच्छा आहे. शांतता याचा अर्थ स्वस्थ बसून राहणे असा नव्हे, तर आपली दररोजची सगळी कामे करून मन प्रसन्न कसे राहील, त्याला आनंदाचा अनुभव कसा येईल. या गोष्टी त्याला शांततेतून मिळवण्याची इच्छा आहे. म्हणजेच पैसा मिळवण्यासाठी जे काही कष्ट करावे लागतील, धडपड करावी लागेल ते करण्याची त्याची तयारी आहे. पैसा हा काही सुखा-सुखी मिळत नाही, त्यासाठी मेहनत, श्रम करावेच लागतात. कोणाचे श्रम बौध्दिक असतात, कोणाचे शारिरीक असतात. ज्याच्या त्याच्या क्षमतेनुसार श्रमाची विभागणी होत असते. मात्र हे श्रम केल्यानंतर पुरेसा पैसा मिळावा आपल्या आणि आपल्या कुटुंबाच्या किमान गरजा भागाव्यात एवढीच सामान्य माणसाची माफक अपेक्षा असते. परंतु आज मनुष्याने स्वत:च्या गरजा इतक्या वाढवून घेतल्या आहेत की त्याला आपल्याकडे कितीही पैसा आला तरी तो पुरतच नाही. मग अधिकाधिक पैसा मिळवण्याकरता त्याची धडपड सुरू राहते. वाटेल त्या जोखिमा तो स्वीकारतो. स्पर्धा करतो.आपल्या शरीराला आणि मनाला वाटेल तसा धावडवतो.अशा वेळी सतत ताण-तणावाखाली राहिलेल्या मनाला सुखाचा अनुभव येत नाही. आनंदाचा उपभोग घेता येत नाही. असे सतत गरजा पूर्ण करण्यासाठी आणि पैशांच्या मागे धावत राहणारे मन सतत अशांत राहते. अनेकांच्या बाबतीत पैसा असूनही मनाला सुखाचा अनुभव येत नसल्याची तक्रार ऐकू येते. आधीच चंचल असलेले मन आणखीनच अस्वस्थ होते.ज्यांच्याकडे गरजेपुरता पैसा असतो ते देखील पुरेसा पैसा नाही म्हणून तक्रार करताना दिसतात. आणि मग त्यांचेही मन एका जागेवर स्थिर राहात नाही. भरकटत राहते. मनाची ही भिरभिरणारी अवस्था सुख असूनही त्याचा आनंद घेऊ देत नाही. अशा वेळी त्यातून काय मार्ग सापडेल, याचा शोध सुरू होतो. अनेकजणांना निश्चित उपाय माहीत नसल्यामुळे पैसे देऊन शांतता विकत घेण्याचा प्रयत्न करतात, म्हणजेच कुठेतरी पिकनिकला जाण्यापासून ते चित्रपट, नाटक पाहून हॉटेलिंगमध्ये पैसे खर्च करून मनाची निराशा दूर करण्याचा प्रयत्न करतात. परंतु हे प्रयत्न खूपच वरवरचे असतात.ज्यानां आपल्या मनाचे नेमके दु:ख कळलेले असते, ते थोडा विचार करून भक्तीचा नामस्मरणाचा ध्यान-धारणेचा किंवा विपश्यनेसारखा मार्ग शोधून काढतात. आयुष्यातले काही क्षण का असेना, परंतु पूर्ण वेगळ्या पद्धतीने जगण्याचा प्रयत्न करतात. भरकटणाऱ्या मनाला बांधून पुन्हा एका जागी स्थिर करण्याची त्यांची धडपड चालू राहते.

### शांतता मनाची गरज

सुदैवाने आपल्या भारतीय संस्कृतीने मनाच्या या चंचलतेचा फार गंभीरपणे अभ्यास केला आहे. भगवद्गीतेमध्येसुध्दा मनाच्या या चंचलतेवर मात करायची असेल तर अभ्यासपूर्वक एकाग्रता करता येते, अशाप्रकारचा उपदेश भगवान श्रीकृष्णाने केला होता आणि आपल्या संस्कृतीने योगाभ्यासातून ध्यानधारणेचे महत्वही सिध्द करुन दाखवले. आज जगामध्ये याच योगांचा अभ्यास करुन मनाची शांतता मिळवण्याचा प्रयत्न अनेक लोक करतात. बौध्द तत्वज्ञानानुसार विपश्यनेतून मनाच्या शांततेचा अनुभव प्राप्त करता येतो. असे म्हटले जाते की, शरीराप्रमाणे मनदेखील थकत असते आणि या थकणाऱ्या मनाला एका विशिष्ट प्रक्रियेतून शांतता मिळवण्याचा प्रयत्न केला जातो. त्यालाच 'ध्यान' किंवा 'विपश्यना' म्हणता येईल. ध्यानाच्या आणि विपश्यनेच्या नियमित केलेल्या अभ्यासामुळे मेंदूची लवचिकता वाढते. म्हणजेच बाह्य परिस्थितीशी जुळवून घेण्याची क्षमता वाढीला लागते. असे म्हटले जाते की मन रिलॅक्स झाले की थकवा निघून जातो. शरीराप्रमाणे मनही प्रसन्न होते. ध्यानाच्या वेगवेगळ्या पद्धती आहेत. परंतु सर्वाधिक लोक हे ध्यानाची अतिशय सोपी पध्दत वापरतात. एका जागी एका ठराविक वेळेला आणि ठराविक कालावधीसाठी डोळे मिटून आणि आपल्या श्वासावर लक्ष केंद्रीत करून स्थिर बसण्याची क्रिया केली जाते. त्याला साधारण स्वरुपाचे ध्यान म्हणतात. काही वर्षे नियमितपणे हा अभ्यास केला तर गंमतीने तर असेही म्हटले जाते की झोप म्हणजे नाईलाजाने घेतलेली विश्रांती तर ध्यान म्हणजे इलाज म्हणून तयार केलेली एक शांत अवस्था असते. काही वर्षांपूर्वी आपल्याच देशातल्या ऑल इंडिया इन्स्टिट्यूटच्या डॉ.बी.के. आनंद यांनी आणि हॉरवर्ड विघापीठातल्या डॉ.रॉबर्ट वॉलेस आणि अल्बर्ट बेनसन यांनी ध्यानविषयक काही निरिक्षणे नोंदवली होती. ध्यान किंवा विपश्यनेच्या काळात खरे तर विचाररहित होणे अपेक्षित असते. परंतु नव्वद टक्के लोकांच्या बाबतीत अशी स्थिती येत नाही. आणि मग त्याऐवजी मन स्थिर करून विचारांची गती कमी केली जाते. ही गती कमी झाल्यामुळे हृदयाची स्पंदने कमी होतात. ऑक्सिजनची गरज कमी होते आणि त्यामुळे विश्रांतीचा अनुभव येतो. याच ध्यानसाधनेला मौनाची आणि दीर्घ-श्वसनाची जोड मिळाल्यामुळे हृदयरोग आणि रक्तदाबही आटोक्यात येतो. याचा अर्थ ध्यान किंवा विपश्यनेमध्ये एक विलक्षण मनोवैज्ञानिक घटना घडतात त्याचा लाभ होतो आणि त्यातून भरकटणाऱ्या मनाला किंवा चंचल मनाला काही काळ शांततेचा अनुभव घेता येतो.

### विपश्यनेचा लाभ

विपश्यनेबाबतही अनेकांचे चांगले अनुभव आहेत. 'विपश्यना' हा मूळ पाली भाषेतला शब्द आहे याचा अर्थ विशेष रूपाने पाहणे असा केला जातो.ही पध्दत भगवान गौतम बुध्दांनी शोधली. प्राचीन काळी लक्षावधी भारतीयांनी ती वापरली. परंतु परकियांच्या आक्रमणामध्ये ती लुप्त झाली होती. भारतात सत्यनारायण गोयंका यांनी ती आणली. ईगतपुरीचे विपश्यना केंद्र अशाच मनाच्या साधनेचे केंद्र ठरले. त्याचा आज अनेक लोक लाभ घेत असतात. ध्यान आणि विपश्यनेतून विचारांच्या गतीवर नियंत्रण आणण्याचे मोठे कार्य घडून येते आणि मनुष्याला आपल्या मध्येच असलेल्या शांततेचा शोध लागतो. दुर्दैवाने आज पैशामध्येच सुख मोजण्याच्या प्रवृत्तीमुळे स्वत:मध्येच असलेली शांतता मनुष्य गमावून बसलेला आहे. त्यासाठीच त्याला काही काळ एकांत हवा असतो. त्यातून शक्य तेवढा आनंद मिळवण्याचा तो प्रयत्न करतो. म्हणूनच शांतता ही प्राणवायुइतकीच गरजेची गोष्ट आहे, हे लक्षात घेतले पाहिजे.

## मुखशुद्धी

एक मुलगा असतो, तो शंकराची खूप आराधना करतो.

एके दिवशी शंकर प्रसन्न होऊन त्याला बोलतो, 'तुला काय हवे आहे?'

'मला डी.जे.सिस्टीम हवी आहे.'

त्यावर शंकर बोलतात,

'माझ्याकडे डी.जे.सिस्टीम असती, तर मी डमरू थोडाच वाजविला असता.'

## पंचांग

**सोमवार, १२ मार्च २०१२**

शके १९३३ खरनामसंवत्सर,

* फाल्गुन कृष्ण पंचमी ● **नक्षत्र:** स्वाती

● रवी उदय ०६-५१, रवी अस्त १८-४६

**जन्मराशी:** ००-०१ ते २४-०० तूळ

रंगपंचमी, यशवंतराव चव्हाण जन्मदिन

संपादक, मुद्रक, प्रकाशक व संचालक: **सौ. जयश्री खाडिलकर-पांडे**
मुद्रक-प्रकाशन स्थळ : नवाकाळ प्रेस, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगाव, मुंबई -४००००४. टेलिफोन : २३८८०९८१,
जाहिरात विभाग: २३८६०९८७,२३८४१५२४, फॅक्स नं.: २३८१०१७६
वितरण: २३८२४४६६, फॅक्स नं. : २३८६ ०९८९, २३८७ ४९११.
**कार्यकारी संपादक : रोहित पांडे**
info@navakal.org
http://navakal.org
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

## कविता यशवंतराव

यशवंतराव अमर जाहले!
शतकांतील नेतृत्त्व हरपले!!
वंदनीय व्यक्तित्व निमाले!
तळपते महा-तेज लोपले!!
राजकारणातील सद्गुणी!
वरिष्ठांतले ते मुकुटमणी!!
अविचल नेता, ते कीर्तिवंत!
महाराष्ट्रातील भाग्यवंत!!
रसिक-खिलाडू ते साहित्यिक!
जातिवंत कुशल प्रशासक!!
हजरजबाबी बुद्धिमंत!
लेखक-कविसम, विचारवंत!!
श्री. चव्हाण 'चैतन्य' निमाले!
यशवंतराव अमर जाहले!!

**- रामचंद्र पां. परब**
माझगाव, मुंबई- ४०००१०.
**मो. ९२२४३२०७५०**

# महाराष्ट्राला दुहेरी मुकुट
# कल्पना-जितेंद्र सर्वोत्तम लिफ्टर

**मुंबई, रविवार - जबलपूर येथे नुकत्याच संपन्न झालेल्या पश्चिम भारत पुरुष आणि महिला पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत महाराष्ट्राचा खेळाडूंनी घवघवीत यश संपादन करताना दुहेरी मुकुटाचा मान मिळविला. महाराष्ट्राच्या पुरुष आणि महिला संघाने सांघिक विजेतपद पटकाविले तर महाराष्ट्राच्याच कल्पना सावंत आणि जितेंद्र विचारे यांनी सर्वोत्तम लिफ्टरचा मान मिळविला.**



याचवेळी झालेल्या राष्ट्रीय सब ज्युनियर, ज्युनियर, सिनियर आणि मास्टर्स पुरुष-महिला बँच प्रेस स्पर्धादेखील संपन्न झाली. त्यातदेखील महाराष्ट्राने चांगले यश संपादन केले. कल्पना सावंत कुर्ला पोलीस ठाण्यात कार्यरत असून श्री साटम, श्री भालेराव आणि जगदीश साईल या पोलीस अधिकाऱ्यांचे मोलाचे सहकार्य तिला नेहमीच मिळते.

नामवंत प्रशिक्षक जीवनगौरव पुरस्कारचे मानकरी मधुकर दरेकर कल्पनाचे प्रशिक्षक आहेत. स्पर्धेतील महाराष्ट्राचे यशस्वी खेळाडू पुढीलप्रमाणे- पश्चिम भारत स्पर्धा (पुरुष)- जितेंद्र विचारे, सागर मोरे, महमद मुल्ला (सुवर्ण) महिला - प्रतिमा वाशिवले, कल्पना सांवत, सोनाली गिते (सुवर्ण).

बँचप्रेस स्पर्धा-कल्पना सावंत, नेहा ईरानी (दोघी सुवर्ण) जितेंद्र विचारे, महेश शिंदे (सुवर्ण)

इक्वीपाईड गट महिला- कल्पना सावंत, लीला फड (सुवर्ण)

बँचप्रेस (सब ज्युनिअर पुरुष)- ओमकार अकोलकर (सुवर्ण), महिला - तेजस्विनी सावंत (सुवर्ण), ज्युनियर महिला- वल्लरी दवेळेकर, बँचप्रेस इक्विपाईड पुरुष- महमद मुल्ला, महिला-वल्नरी दवेळेकर.

अनइक्विपाईड पुरुष- राजेश परब, अनील म्हात्रे, सैदल सोंडे (सवर्ण). महिला - वि. सावंत (सुवर्ण), इक्विपाईड महिला- विजया नर (सुवर्ण), अनइक्विपाईड महिला- विजया नर (सुवर्ण).

## झुनझुनवाला, रुपारेल, साठ्ये कॉलेज विजयी

मुंबई, रविवार - दादर (प) शिवाजी पार्क येथील एस. पी. ग्रुप बंगाल क्लब क्रिकेट अॅकॅडमीतर्फे आयोजित केलेल्या आंतरकॉलेज क्रिकेट स्पर्धेत झुणझुणवाला, साठे, रुपारेल आणि निर्मला मेमोरियल कॉलेजने विजय मिळविले. झुनझुनवालाने एन. एस. एस. कॉलेजचा, रुपारेलने विवेकानंदाचा, साठ्येने एम.एम.के. कॉलेज आणि निर्मला मेमोरियल कॉलेजने पी.डी लायन्स कॉलेजचा पराभव केला.

झुनझुनवालातर्फे अजिंक्य पाटीलने ९३, पंडीतने ४० आणि जोशीने ३५ धावा केल्या. जोशीने अष्टपैलू खेळ करताना ४ बळीदेखील टिपले. त्यालाच सामनावीर पुरस्कार देण्यात आला. रूपारेलतर्फे दळवीने नाबाद ४६ धावांची सुरेख खेळी केली. तसेच २ बळीदेखील घेतले. तोच सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.

साठ्ये कॉलेजच्या विजयात तेजस ३५, गौरव नाबाद ७१ धावा यांचा मोठा वाटा होता. गौरवला सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले. निर्मला कॉलेजतर्फे नितेशसिंगने नाबाद ४४ आणि सचिनने नाबाद २८ धावा केल्या. ४ बळी घेणारा परितोष पोकळे सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.

## राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत महिला मुष्टियुद्धाचा समावेश

नवी दिल्ली, ता.११ - आगामी राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धात महिलांच्या मुष्टियुद्ध खेळाचा समावेश करण्यात येणार असल्याचा निर्णय राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा समितीच्या सेंट किट्स येथे झालेल्या बैठकीत घेण्यात आला. या स्पर्धेत तीन गटाचा समावेश करण्यात येणार असल्याचे पक्के झाले आहे. यंदा होणाऱ्या लंडन ऑलिम्पिक स्पर्धेत प्रथमच महिलांचे मुष्टियुद्ध खेळाचे सामने होणार आहेत.

## बेनहर सोलोमनला दुहेरी मुकुट



सोलोमन, पूर्णपात्रे पाहुण्यांकडून चषक घेताना

मुंबई, रविवार - चर्चगेट येथील बॉम्बे जिमखाना आणि बॅडमिंटन ४५ यांच्या संयुक्त विद्यमाने नुकत्याच घेण्यात आलेल्या जी. डी. बिर्ला मेमोरियल मास्टर बॅडमिंटन स्पर्धेत मुंबई विद्यापीठ बॅडमिंटन संघाचा माजी कर्णधार बेनहर सोलोमनने दुहेरी मुकुटचा मान मिळविला.

त्याने पुरुष एकेरी आणि पुरुष दुहेरी या ४५ वर्षांवरील गटातील स्पर्धा जिंकल्या. पुरुष दुहेरी त्यानी पुणे विद्यापीठ बॅडमिंटन संघाचे माजी कर्णधार मिलिंद पूर्णपात्रे यांच्या सोबत जेतेपद पटकाविले.

## रिझवीला जेतेपद

मुंबई, रविवार - आंतरकॉलेज क्रिकेट स्पर्धेत यंदादेखील रिझवी कॉलेजने जेतेपद कायम राखले. अंतिम फेरीत त्यांनी झुनझुनवालाचा दणदणीत पराभव केला. विजयी संघातर्फे स्वप्नील साळवी, केविन, अल्तेदा आणि विनायक भोईरने दमदार शतके काढली. झुनझुनवालाच्या अजिंक्य देशपांडेने ३ बळी घेतले.

## भारतात होणार विश्व बुद्धिबळ स्पर्धा

चेन्नई, ता.११- येत्या एप्रिल-मे २०१२ मध्ये भारतात प्रथमच चेन्नईत विश्व बुद्धिबळ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. दर दोन वर्षांनी होणाऱ्या या स्पर्धेत भारताचा जगज्जेता नामवंत बुद्धिबळपटू विश्वनाथन आनंद इस्त्रायलच्या बोरिस गेलफंडशी मुकाबला करेल.

१२ फेऱ्यांच्या या स्पर्धेत जो खेळाडू प्रथम ६.५ गुण मिळवेल तो विश्वविजेता ठरेल. २०१०मध्ये आनंदने बल्गेरियात झालेल्या या स्पर्धेत वेसेलिन टोपोलॉवचा पराभव करून जेतेपद पटकावले होते. या स्पर्धेबाबत जागतिक बुद्धिबळ महासंघाचे अध्यक्ष किर्सन इल्यूम निजोव यांनी तामिळनाडूच्या मुख्यमंत्री जयललिता यांची भेट घेतली. स्पर्धेचे अंदाजपत्रक २० कोटी रुपये आहे. तामिळनाडू सरकार या स्पर्धेचे मुख्य पुरस्कर्ते असतील. भारतातील २४मधील १० ग्रॅन्डमास्टर सध्या तामिळनाडूत आहेत. जागतिक क्रमवारीत भारत सातव्या क्रमांकावर आहे.

## सुशांत, मधुरा प्रथम

मुंबई, रविवार - दादर (प.) येथील शालिनी पॅलेसमध्ये को-ऑपरेटिव्ह बँक एम्प्लॉईज युनियन, मुंबई यांच्यातर्फे घेण्यात आलेल्या आंतरबँक सहकारी बुद्धिबळ स्पर्धेत ग्रेटर बँकेच्या सुशांत पालकर आणि नॅशनल को-ऑप. बँकेच्या मधुरा वंजारीने पहिला क्रमांक मिळविला. सहा फेऱ्यांची ही स्पर्धा स्वीस लीग आधारावर घेण्यात आली. सुशांतने सहाही स्पर्धा जिंकून सहांपैकी सहा गुण मिळविले. एनकेजीएसबी बँकेच्या मयुरेश बांडकरने पाच गुण मिळवून दुसरा क्रमांक मिळविला.

महिला गटात मधुराने देखील ६ पैकी ६ सामने जिंकून जेतेपद मिळविले. एनकेजीएसबी बँकेच्या वनिता चौगुलेने ५ गुण मिळवून द्वितीय क्रमांक मिळविला. आमदार कॅप्टन अभिजित अडसूळ, आंतरराष्ट्रीय कॅरमपटू अरुण केदार आणि शेखर देसाई यांच्या हस्ते विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली. पी.बी. भिल्लारे यांनी स्पर्धेत प्रमुख पंच म्हणून काम बघितले. या अगोदर युनियनतर्फे आंतर बँक क्रिकेट स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. त्या स्पर्धेलादेखील बँकांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

## भारतीय नेमबाजी संघ जाहीर

नवी दिल्ली, ता.११- आगामी लंडन ऑलिम्पिकसाठी भारतीय नेमबाजी संघटनेने भारतीय संघाची घोषणा केली आहे. भारतीय संघात गगन नारंग, अभिनव बिंद्रा, संजीव राजपूत, जॉयदीप कर्माकर, अनुराज सिंग, हिना सिंधू, राही सरनोबत, मानवजित सिंग संधू, रंजन सोधी, विजयकुमार आणि शंगुन चौधरी यांचा समावेश होता.

बीजिंग ऑलिम्पिक स्पर्धेत रौप्यपदक विजेत्या राज्यवर्धन सिंग राठोडला यंदा भारतीय संघात स्थान मिळाले नाही. त्याचा राखीव खेळाडूत मात्र समावेश केला गेला आहे.

## हरिश भालेकर यांना पुरस्कार



मुंबई, रविवार - मुंबई उपनगर खो-खो संघटनेचे संस्थापक सदस्य खो-खो चे प्रचारक, प्रसारक व संघटक खार पश्चिम येथील बी.पी.एम.हायस्कूलचे ज्येष्ठ शिक्षक, मुंबई मैदान बचाव समितीचे क्रियाशील सदस्य हरिश पांडुरंग भालेकर यांना २०११-२०१२ या शैक्षणिक वर्षातला स्व.व्ही.एम.हेरवाडकर व स्व.दशरथकुमार बारोट यांच्या स्मरणार्थ ठेवलेला 'शिक्षक सेवा गौरव पुरस्कार' मुंबई सबर्बन एज्युकेशन सोसायटीने प्रदान करून गौरविण्यात आले. भालेकर हे मागील ३५ वर्षांपासून बी.पी.एम.मध्ये सेवारत असून त्यांचा मुंबईतील विविध सामाजिक, शैक्षणिक व क्रीडा संस्थांशी निकटचा संबंध आहे.

## अशा नराधमांना फाशीच्या तख्तावर चढवाच...

**मनोगत**

दिवा पूर्व (मुंब्रा कॉलनी) येथील विभागात राठोड नावाच्या नराधमाने १२ वर्षांच्या इयत्ता ६वीत शिकणाऱ्या मुलीला घरात बोलावून पाशवी अत्याचार केला. त्यानंतर त्याने आपल्या क्रुरकर्माचा पर्दाफाश होऊ नये म्हणून तिची हत्या केली व मृतदेह गोणीत भरून नाल्यात टाकला गुन्हेगार फरार झाला. अशा भीषण घटना या संताच्या भूमीत नेहमी घडत आहेत. गुन्हेगार मोकाट सुटत आहेत. न्यायालयाने अशा नराधमांना त्वरित फाशीच्या तख्तावर चढवण्याची शिक्षा द्यावी किंवा त्याला नामर्द करावे. तरच अशा भयंकर घटना पुन्हा-पुन्हा घडणार नाहीत.

**- चंद्रकांत आत्माराम साखरकर**
शुभ्रता बिल्डिंगसमोर, रिलायन्स टॉवरजवळ दिवा (पूर्व).
**मो. नं.- ९२२२२ २६३ ७६**




# नवाकाळ

मुंबई, सोमवार १२ मार्च, २०१२ पान - ८




## आक्रमक कार्यकर्त्यांच्या संरक्षणात नाशिकचे मनसे उमेदवार सातपुड्याच्या सहलीवर

नाशिक, ता.११- विरोधी पक्षांकडून दगाफटका होऊ नये यासाठी आज मनसेने आपले चाळीस नगरसेवक सहलीला नेले आहेत. त्रिशंकू परिस्थिती असलेल्या महापालिकेत महापौरपदाची गुंतागुंत अधिक वाढली असून फोडा-फोडीच्या राजकारणापासून आपल्या पक्षाच्या नगरसेवकांना दूर ठेवण्यासाठी आघाडी आणि शिवसेनेनंतर आता मनसेनेही आपले नगरसेवक सहलीला नेले आहे.आघाडीचे नगरसेवक लोणावळ्यात तर शिवसेनेचे मुंबईत सहलीचा आंनद लुटत आहेत. मनसेने मात्र सहल नेमकी कुठे जाणार याविषयी पूर्ण गोपनियता पाळली असून राजकीय डावपेच आखण्यासाठी प्रदेश सरचिटणीस अतुल चांडक यांच्यासह तीनही आमदार शहरातच आहेत. मनसेचे नगरसेवक सातपुड्याला गेल्याची माहिती विश्वासनिय सूत्रांनी दिली असून प्रवासात कोणताही दगाफटका होऊ नये यासाठी तसेच वेळप्रसंगी कोणत्याही प्रसंगाशी मुकाबला करू शकणाऱ्या आक्रमक कार्यकर्त्यांची फौज नगरसेवकांबरोबर तैनात करण्यात आली आहे.

सहलीला बाहेरगावी जाण्याचा निर्णय दोन दिवसांपूर्वीच झाला होता. काल शिवजयंती होताच आज सकाळी मनसेचे सर्व नगरसेवक भाभानगर येथील आ.वंसत गिते यांच्या निवासस्थानासमोर जमले. दगाफटका होवू नये, प्रवासात अडचण आल्यास काय आणि कशी काळजी घ्यायची,मनपात सत्ता यावी यासाठी स्वत; राज साहेब करत असलेले प्रयत्न याविषयीचे मार्गदर्शन यावेळी वसंत गिते यांनी केले.त्यानंतर मनसेचे चाळीस नगरसेवक नीता ट्रॅव्हलर्सच्या एका लक्झरी बसने सहली साठी बाहेरगावी रवाना झाले आहे. यावेळी आमदार वसंत गिते,नितीन भोसले,उत्तमराव ढिकले,अतुल चांडक हे मान्यवर उपस्थित होते. निवडून आल्यानंतर तिसऱ्याच दिवशी मनसेचे नगरसेवक गुजरात येथे सहलीसाठी गेले होते.महापौरपदाची निवडणूक जवळ येऊ लागल्याने पक्षीय वातावरण तापू लागले आहे.

पळवापळवी,फोडाफोडी यापासून सावध राहण्यासाठी सर्वच पक्ष आपापल्या नगरसेवकांना सहलीचे निमित्त करून सुरक्षित ठिकाणी नेत आहेत.

सहलीला गेलेले सर्वच पक्षांचे नगरसेवक १५ तारखेला थेट सभागृहात येणार आहेत. भाजपाचे मात्र सर्व नगरसेवक शहरात असून ते १३ तारखेला सहलीसाठी जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे.महापौर शिवसेनेचा वा मनसेचा होवो उपमहापौर मात्र भाजपाच होणार असल्याची चर्चा शहरभर रंगत आहे.




## कोल्हापुरात टोलविरोधात हजारो वाहनांची रॅली

कोल्हापूर, ता.११- जोपर्यंत टोल हद्दपार होत नाही तोपर्यंत आंदोलन सुरूच ठेवण्याचा निर्धार केलेल्या कोल्हापूरकरांनी आजही टोलविरोधात विराट रॅली काढून टोलचा निषेध करून कडाडून विरोध केला. या रॅलीमध्ये दुचाकी, तीन चाकी अवजड अशी हजारो वाहने सहभागी झाली होती. संभाजीनगर येथून सुरू झालेली ही रॅली शहरातील प्रमुख मार्गावरून शेवटी जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ येऊन विसर्जित करण्यात आली. रॅलीचे नेतृत्व टोलविरोधी कृती समितीने केले. रॅलीत सर्वपक्षीय नेते सहभागी झाले होते.

सकाळी ११ वाजता रॅलीचा शुभारंभ जिल्ह्याचे खासदार सदाशिव मंडलिक यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी माजी आमदार मालोजी राजे छत्रपती. आ.चंद्रकांत दादा पाटील यांच्यासह शहरातील नगरसेवक व विविध पक्षाचे कार्यकर्ते सहभागी झाले होते. रॅलीमध्ये टोप वाहतूक संघटनेचे जवळपास दोनशेडंपर जिल्हा वाळू वाहतूक संघटनेचे ट्रक्स, गारगोटी प्रवासी वाहतूक संघटनेची सर्व वाहने आणि जिल्ह्यातील प्रवासी वाहतूक संघटनांची सर्व प्रकारची वाहने सहभागी झाल्याने या रॅलिला विराट रूप प्राप्त झाले होते. टोल विरोधी निघालेल्या या जनजागृती रॅलीमध्ये आयआरबी कंपनीच्या विरोधात व टोल हद्दपार करा या प्रकारच्या घोषणाही देण्यात आल्या.

महाराष्ट्र नवनिर्माण सेना, ब्लॅक पॅंथर, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, मनसे महिला आघाडी. त्याचबरोबर भारतीय जनता पार्टीचे जिल्हाध्यक्ष महेश जाधव, पंडितराव सडोलीकर, दिलीप देसाई, राजू जाधव, सुभाष देसाई, सुभाष वोरा, सत्यजीत कदम, कृती समितीचे बाबा पार्टे, निवासराव सोळोखे, किशोर घाटगे आदींचा सहभाग होता.

## अपहरण केलेल्या औरंगाबादच्या माजी नगरसेवकाचा खून

औरंगाबाद, ता. ११ - सात दिवसांपूर्वी शहरातील आसेफिया कॉलिनीतून कारसहित अपहरण करण्यात आलेले माजी नगरसेवक सलीम कुरेशी यांचा मृतदेहच जमिनीत पुरलेल्या अवस्थेत आढळून आल्याने खळबळ उडाल्यानंतर कुरेशी यांचा खूनच करण्यात आल्याचे उघड झाले आहे.

कुरेशी यांचे भाऊ हलीम कुरेशी यांनी सलीम कुरेशी यांच्या अपहरणाची तक्रार दिली होती. त्यावेळी चौघाजणांवर अपहरण केल्याचा गुन्हा नोंदविण्यात आला होता. शेख जावेद शेख (हैदराबाद), हरीअण्णा, सावेर आणि अकोला येथील शेख जावेदचा मेहुणा खलील अशी या चौघांची नावे असून यापैकी खलील याला पोलिसांनी ताब्यात घेतला होता. त्याच्या तपासातूनच हे खुनाचे षडयंत्र बाहेर आले आहे. मयत सलीम शेख हे माजी नगरसेवक असून त्यांची पत्नी सलमा कुरेशी या राष्ट्रवादीच्या विद्यमान नगरसेविका आहेत. सलीम कुरेशी हे रॉक्सी टॉकिजचे मालक आहेत. या टॉकीच्या आर्थिक वादीतूनच त्यांचे अपहरण करण्यात आल्याची तक्रार त्यांच्या भावाने दिली होती.

